| धाराशिव | वर्ष २५ वे | अंक २८२ वा | शनिवार दिनांक २४ जानेवारी, २०२६ | पृष्ठे ६ | किंमत ०१ ₹ RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## क्राईम न्युज

### अवैध मद्य विरोधी कारवाई

धाराशिव (प्रतिनिधी)- ग्रामीण पोलीस ठाणे अंतर्गत मैनाबाई रा. अंबेजवळगे ता. जि. धाराशिव या दि.२२.०१.२०२६ रोजी आपल्या राहत्या घरासमोर अंदाजे १,५५० किंमतीची १५ लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. तर कलाबाई रा. अंबेजवळगे ता. जि. धाराशिव या दि.२२.०१.२०२६ रोजी आपल्या राहत्या घरासमोर अंदाजे १,०५० किंमतीची १० लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द धाराशिव ग्रामीण पो ठाणे येथे स्वतंत्र २ गुन्हे नोंदविले आहेत.

भुम पोलीस ठाणे अंतर्गत नामे-अशोक वय २९ वर्षे, रा.वरुड ता. भुम जि. धाराशिव हे दि.२२.०१.२०२६ रोजी वरुड शिवारात भुम ते पाथरुड जाणारे रोडलगत हॉटेल शिवसाई हॉटेलच्या बाजूला पत्राचे शेडसमोर अंदाजे १,२०० किंमतीच्या देशी विदेशी दारुच्या १२ सिलबंद बाटल्या अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेल्या जप्त करण्यात आल्या. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द अन्वये भुम पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे.

शिराढोण (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत शरिफ रा.झाडबुके मैदान १६९० बार्शी ता. बार्शी जि. सोलापूर हे दि.२२.०१.२०२६ रोजी हॉटेल नायगाव शिवारातील नायगाव मुरुडचे रोडलगत रुद्रांश हॉटेलच्या पाठीमागील बाजूस अंदाजे ३,८०० किंमतीच्या देशी विदेशी दारुच्या ३९ सिलबंद बाटल्या अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेल्या जप्त करण्यात आल्या. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-६५(ई) अन्वये शिराढोण पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे.

## 'हिंद-दी-चादर' श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त व्याख्यान व आश्रमशाळा क्रीडा बक्षीस वितरण कार्यक्रम उत्साहात



धाराशिव, (जिमाका) इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत हिंद-दी-चादर श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त व्याख्यान तसेच आश्रमशाळा क्रीडा बक्षीस वितरण कार्यक्रम आयोजित करण्यात आला. त्या अनुषंगाने इतर मागास बहुजन कल्याण विभागांतर्गत डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन,धाराशिव येथे आज २३ जानेवारी २०२६ रोजी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.तेजस माळवदकर, प्रादेशिक उपसंचालक,इतर मागास बहुजन कल्याण (प्रादेशिक) विभाग,लातूर हे उपस्थित होते.कार्यक्रमात व्याख्याते म्हणून श्री.भैरवनाथ कानडे यांनी सहभाग घेतला,कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून श्री.अमोल ताकभाते, सहाय्यक संचालक,इतर मागास बहुजन कल्याण,धाराशिव यांनी अध्यक्षस्थान भूषविले. कार्यक्रमास जिल्ह्यातील आश्रमशाळातील सुमारे २०० ते २५० विद्यार्थी व विद्यार्थिनींनी सहभाग नोंदविला.

यावेळी प्रमुख पाहुणे डॉ.तेजस माळवदकर व व्याख्याते श्री. भैरवनाथ कानडे यांनी हिंद-दी-चादर श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या जीवनकार्यावर सखोल प्रकाश टाकत,त्यांच्या त्याग, शौर्य व धर्मस्वातंत्र्यासाठी दिलेल्या प्रयत्नांना बलिदानाची प्रेरणादायी माहिती उपस्थितांना दिली.

कार्यक्रमाच्या दुसऱ्या टप्प्यात आश्रमशाळेतील विद्यार्थी व विद्यार्थिनींना जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धांतील यशाबद्दल क्रीडा बक्षीस वितरण करण्यात आले.तसेच क्रीडा स्पर्धांच्या यशस्वी आयोजनासाठी योगदान दिलेल्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सहाय्यक संचालक,इतर मागास बहुजन कल्याण,धाराशिव कार्यालयातील निरीक्षक श्री.युवराज भोसले,श्री. संदेश घुगे,वरिष्ठ लिपिक श्री.विकास राठोड तसेच इतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## जिल्हा परिषद रणशिंग फुंकले! सुरज महाराज साळुंखेंच्या नेतृत्वाखाली शिवसेना शिंदे गटाचा 'मिशन ZP' मोड ऑन



**धाराशिव (रामेश्वर डोंगरे )** जिल्हा परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेना (शिंदे गट) पूर्ण ताकदीने मैदानात उतरली असून, माननीय सुरज महाराज साळुंखे यांच्या नेतृत्वाखाली जिल्ह्यातील राजकीय समीकरणे झपाट्याने बदलताना दिसत आहेत. गावोगाव सुरू असलेल्या बैठका, कार्यकर्ता संवाद, महिला मेळावे आणि गट-गणनिहाय आढावा यामुळे शिवसेनेने जिल्हा परिषद निवडणुकीसाठी स्पष्ट रोडमॅप तयार केला आहे.

जिल्हा परिषदेत केवळ संख्याबळ नव्हे, तर काम करणारे, जनतेत विश्वास असलेले आणि पक्षाशी निष्ठावान उमेदवार देण्याचा निर्धार सुरज महाराज साळुंखे यांनी केला आहे. प्रत्येक गटात स्थानिक प्रश्न समजून घेणारा चेहरा, तरुण-अनुभवाचा समतोल आणि महिलांचा निर्णायक सहभाग हे या निवडणुकीचे प्रमुख सूत्र ठरणार आहे.

ग्रामपातळीपासून ते तालुका स्तरापर्यंत शिवसेना शिंदे गटाची संघटनात्मक यंत्रणा सक्रिय झाली असून, बूथ मजबूत करा - गट जिंका - जिल्हा परिषद आपल्या ताब्यात आणा हा स्पष्ट संदेश कार्यकर्त्यांपर्यंत पोहोचवला जात आहे. विरोधकांच्या हालचालींवर बारीक लक्ष ठेवत, रणनीतीपूर्वक उमेदवारांची चाचपणी सुरू आहे. सध्या जिल्ह्यातील अनेक प्रस्थापित नेते व कार्यकर्ते शिवसेना (शिंदे गट) कडे सकारात्मकपणे पाहत असून, जिल्हा परिषद निवडणुकीत मोठे राजकीय धक्के बसणार अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे. सुरज महाराज साळुंखेंचा थेट जनसंपर्क, कार्यकर्त्यांवरील पकड आणि नेतृत्वगुण हे या निवडणुकीतील शिवसेनेचे मोठे भांडवल ठरत आहे.

एकूणच, धाराशिव जिल्हा परिषद निवडणूक ही फक्त सत्ता मिळवण्याची लढाई न राहता, शिवसेना शिंदे गटाच्या ताकदीची खरी कसोटी ठरणार असून, सुरज महाराज साळुंखे यांच्या नेतृत्वाखाली ही लढाई निर्णायक व ऐतिहासिक ठरण्याचे संकेत स्पष्टपणे दिसत आहेत.

## सुभाषचंद्र बोस व बाळासाहेब ठाकरे यांना अभिवादन

## लोकशाहीच्या बळकटीसाठी मतदारांचा सक्रिय सहभाग आवश्यक: सोळावा राष्ट्रीय मतदार दिवस उत्साहात साजरा



धाराशिव,दि.२३ जानेवारी (जिमाका) २५ जानेवारी हा राष्ट्रीय मतदार दिवस.लोकशाही व्यवस्थेचा कणा असलेल्या मतदारांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी व मतदान प्रक्रियेत सक्रिय सहभाग वाढविण्याच्या उद्देशाने सोळावा राष्ट्रीय मतदार दिवस जिल्हाधिकारी कार्यालय,धाराशिव येथील सभागृहात आज उत्साहात साजरा करण्यात आला.आयोजन जिल्हा निवडणूक विभागामार्फत करण्यात आले होते.यावेळी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी किर्ती किरण पुजार यांच्या मार्गदर्शनाखाली उपस्थित अधिकारी,कर्मचारी तसेच नागरिकांनी लोकशाहीची मूल्ये जपण्याची,संविधानाने दिलेल्या मतदानाच्या हक्काचा जबाबदारीने वापर करण्याची आणि निवडणूक प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेण्याची सामूहिक मतदार शपथ घेतली.

नेताजी सुभाषचंद्र बोस आणि बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेचे पूजन करून जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी पुष्पहार अर्पण केला. उपस्थितांनी देखील अभिवादन करून पुष्प वाहिली.

राष्ट्रीय मतदार दिवस साजरा करण्यामागील प्रमुख उद्देश म्हणजे नागरिकांमध्ये मतदार म्हणून असलेल्या हक्कांची व कर्तव्यांची जाणीव निर्माण करणे हा आहे. मतदार नोंदणी करणे,मतदान करणे व स्वच्छ,पारदर्शक आणि निर्भय निवडणूक प्रक्रियेत सहभागी होणे हे लोकशाहीच्या सुदृढतेसाठी अत्यंत महत्त्वाचे असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले. लोकशाही टिकवून ठेवण्यासाठी प्रत्येक मताचे महत्त्व अनन्यसाधारण असल्याचे नमूद करण्यात आले. मतदान हे केवळ अधिकार नसून एक सामाजिक व राष्ट्रीय जबाबदारी असल्याची जाणीव नागरिकांनी ठेवावी,असे आवाहन करण्यात आले.विशेषतः युवकांनी मतदार नोंदणी करून पहिल्यांदाच मतदान करताना उत्साहाने सहभागी व्हावे, असेही आवाहन करण्यात आले.

राष्ट्रीय मतदार दिवसानिमित्त मतदारांमध्ये जागरूकता वाढविणे, मतदानाचे महत्त्व अधोरेखित करणे आणि लोकशाही प्रक्रियेत सर्वसामान्य नागरिकांचा सहभाग वाढविण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला.या उपक्रमामुळे मतदारांमध्ये सकारात्मक संदेश गेला असून लोकशाही अधिक सक्षम करण्याच्या दिशेने हे एक महत्त्वाचे पाऊल असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

यावेळी उपजिल्हाधिकारी स्वाती शेंडे,जिल्हा ग्रंथालय अधिकारी श्री. ढाकणे,नायब तहसीलदार सचिन पाटील,संतोष पाटील यांच्यासह जिल्हाधिकारी कार्यालयातील विविध विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## पालकमंत्री प्रताप सरनाईक यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण

धाराशिव (जिमाका)- २६ जानेवारी १९५० रोजी भारतीय संविधानाची अंमलबजावणी होऊन भारत एक प्रजासत्ताक देश बनला. या ऐतिहासिक घटनेच्या स्मरणार्थ दरवर्षी २६ जानेवारी हा दिवस देशभर प्रजासत्ताक दिन म्हणून साजरा केला जातो.यावर्षी भारतीय प्रजासत्ताक दिनाचा ७७ वा समारंभ धाराशिव जिल्ह्यात उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त पालकमंत्री तथा परिवहन मंत्री श्री. प्रताप सरनाईक यांच्या हस्ते मुख्य ध्वजारोहणाचा कार्यक्रम पोलीस मुख्यालय मैदान क्र.२ येथे सोमवार, दि.२६ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ९.१५ वाजता होणार आहे. सकाळी ९.३५ ते ९.५० या वेळेत पोलीस परेड व चित्ररथ संचलनाचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ९.५० ते १०.१० या कालावधीत जिल्हास्तरावर व तालुकास्तरावरून सुमारे ३ हजार विद्यार्थ्यांचा देशभक्तीपर गीतांवर आधारित एकत्रित सामूहिक कवायत कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. त्यानंतर सकाळी १०.१० ते १०.२५ या वेळेत पालकमंत्री श्री. सरनाईक हे स्वातंत्र्य सैनिकांना भेट देऊन त्यांना शुभेच्छा देणार आहेत.

## प्राण्यांना निर्दयपणे वागणुक देवून वाहतुक करणाऱ्यावर गुन्हा दाखल

बेंबळी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत नामे अरुण तात्याराव राठोड, वय २८ रा. एकंबीतांडा ता. औसा जि. लातुर यांनी दि. २२.०१.२०२६ रोजी चिखली पाटी येथे पिकअप क्र एमएच २४ बीडबल्यु ०५०७ मध्ये गोवंशीय जातीचे ६ पांढरे रंगाचा बैल एकुण २,२५,००० किंमतीचे गोवंशीय जातीचे जनावरे त्यांचे चारा पाण्याची व्यवस्था न करता निर्दयतेने कत्तलीसाठी बेकायदेशीर रित्या वाहतुक करत असताना बेंबळी पोलीसांना मिळून आले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे नमूद व्यक्तींविरुध्द प्राण्यास क्रुरतेने वागण्यास प्रतिबंध अधिनियम कलम ११(१)(डी), ११(१)(ई), ११(१)(के) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### एअरटेलचे फायबर अज्ञात व्यक्तीने चोरले

तामलवाडी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे :दि.०७.०१.२०२६ रोजी ००.००ते ०१.२० वा. सु. इंडस टॉवर कंपनी तामलवाडी येथील एअरटेल चे फायबर अंदाजे ४०,०००किंमतीचे अज्ञात व्यक्तीने चोरुन नेले. अशा मजकुराच्या फिर्यादी महादेव पंडीत ढवण, वय ४२ वर्षे, खंडाळा ता. तुळजापूर जि. धाराशिव यांनी दि.२२.०१.२०२६रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन तामलवाडी पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०३ (२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### विद्युत मापक स्काडा केबलची चोरी

वाशी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत घाटनांदुर शिवारातील शेत गअ नं ६८०,६५१ व ८४३ येथील ४ पोलीवरील विद्युत मापक स्काडा केबल अज्ञात व्यक्तीने नुकासान करण्याचे उद्देशाने तोडून कंपनीचे ३,०६,५४९ चे नुकसान केले आहे. अशा मजकुराच्या फिर्यादी फिर्यादी अमोल आश्रुबा मोटे, वय ४१ वर्षे, रा. गिरवली ता. भुम जि. धाराशिव यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन वाशी पो. ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.



ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## महानगराचे महापौर ठरले

राज्यातील महानगरपालिकेचे महापौर अखेर ठरले. आरक्षण जाहिर झाले. आता महापौरपदी कोणाला बसवायाचे किंवा निवडायाची जबाबदारी स्थानिक नेत्यावर आहे. आरक्षणामुळे अनेकापैकी एकाची निवड होवून कारभार चालू केला पाहिजे. राज्यातील महानगरपालिकेच्या निवडणुका प्रदिर्घ काळानंतर पार पडल्या. यावेळी राज्यात भाजपाला चांगले यश मिळविता आले. बाकीच्या नाही असे नाही. इतरही पक्षाचे नगरसेवक निवडूण आले आहेत. एकापक्षाला पुर्ण महानगरपालिका ताब्यात नाही बहुमत असले तरी इतर पक्षाचे उमेदवार निवडूण आले आहेत. अनेक ठिकाणी भाजपाचा महापौर विराजमान होणार आहे. लातूर व चंद्रपूरवगळता भाजपाची चांगली कामगिरी आहे. त्यामुळे भाजपावर मोठी जबाबदारी आली आहे. पंतप्रधान व राज्याचे मुख्यमंत्री भाजपाचे असल्याने निधीत कमतरता भासणार नाही. मुळात आपल्या राज्यात तसे मुलभूत मोठे प्रश्न नाहीत. अनेक प्रश्नाची सोडवणुक झालेली आहे. तसे पाहिले तर शहराच्या मग कोणते का शहर असत नाही. समस्या ह्या सारख्याच असतात. पन्नास वर्षात त्या कायम स्वरूपात न सोडविल्यान त्याच-त्या आहेत. त्यामुळे राज्य सरकारने पहिल्यांदा महानगरपालिकेत कोणते काम प्राधान्याने करावे याचे परिपत्रक काढले पाहिजे. सर्वात मोठा व ज्वलंत प्रश्न हा पिण्याच्या पाण्याचा आहे. तो सर्वत्र आहे. काही ठिकाणी हा प्रश्न सोडविला आहे. ज्या महानगराच्याजवळ नदी, बंधारा किंवा धरण असेल तर प्रश्न सुटला असला तरी वितरण या ठिकाणाची बिघाडली आहेत. त्यामुळे शहरातील नागरिकांना शुद्ध पिण्याचे पाणी मिळाले पाहिजे. काही झाले तरी पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायम स्वरूपात सुटला पाहिजे. काही ठिकाणी निधीचा अभाव आहे तर काही ठिकाणी मानसिकता नाही. अशा स्थितीत आडकलेला पिण्याच्या पाण्याचा प्रश्न हा कायम स्वरूपी सोडविला पाहिजे. दर पाच वर्षांनी त्याच प्रश्नाची उकल होत असेल तर योग्य नाही. राज्यातील महानगरपालिकेस विविध वर्गात आहेत. जसे ड वर्गात लातूर महानगरपालिका मोडते. आता तर लातूर महानगरपालिका ही काँग्रेसच्या ताब्यात गेल्यास निधीची कमतरता भासेल असे नागरिकांना वाटणे स्वाभाविक आहे. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत निवडणुका झाल्यानंतर जनतेनी जो कौल दिला त्याचा आदर करून चालले पाहिजे. महापौर झाल्यावर तो पक्षाचा नसतो तर नागरिकांचा असतो. त्यामुळे नागरिकांची प्रश्न सोडविणे अद्य कर्तव्य आहे. ते पार पाडले पाहिजे. काही ठिकाणी महापौरपदाची पहिलीच माळ गळ्या पडलेली असते. त्यामुळे घाबरून न जाता जनतेची कामे केल्यास लोकप्रियता आपोआत मिळते. जर पक्षीय राजकारण केले तर काम करणे आवघड असते. स्वकियापेक्षा विरोधकांच्या प्रश्नाला प्राधान्य दिले पाहिजे. महापौर ही सर्वात मोठी जबाबदारी आहे. तसे पाहिले तर आमदारासारखा मान आहे. तो सांभाळला पाहिजे. त्यामुळे नियोजन करून विकास केला पाहिजे. शहरातील जी तज्ज्ञ मंडळी, विचारवंत आहेत. जानकार अभ्यासू मंडळी, पत्रकार आहेत त्यांच्याशी संपर्क ठेवला पाहिजे. शहरात कशाची कमतरता आहे. कोणती कामे हाती घेणे योग्य आहे याची चापचणी होणे अपेक्षित आहे. त्यामुळे सर्वात मोठे व जबाबदारीचे पद महापौर आहे. हे सतत लक्षात ठेवले पाहिजे. आपल्या राज्यात अनेक विकासाची कामे झालेली आहे. शहरातील कामे काही नवीन नसतात. तेची ती स्वच्छतेचा, वीजेचा, पाणी पुरवठेचा अशीच ज्वलंत प्रश्न असतता. नवीन हद्द जर आली तर तेथे जोमाने काम टप्पाटप्प्याने करावे लागते. शहर जर जुने असेल तेथे पुर्वी नगरपालिका असते. त्यावेळी बरीच विकासाची कामे झालेली असतात. त्यामुळे अधिक चिंताग्रस्त होण्यापेक्षा पदभार घेतल्यास कामाला लागणे आवश्यक आहे. ज्यावेळी कामाला लागतात त्यावेळी चुका होतात. काम केल्यासच चुका होतात. मतदार जनता बोलेल, याकडे गांर्भीयाने न घेता, झालेल्या चुका सुधारण्याचा प्रयत्न केला पाहीजे. टिका ही होतील,कामाची प्रशांसा ही होईल हे लक्षात ठेवले पाहिजे. टिकेकडे तसे लक्ष न दिलेले बरे! कारण टिका ही पंतप्रधावर किंबहुन मुख्यमंत्री यांच्यावर होते. याला विकासाच्या कामाद्वारे उत्तर दिले पाहिजे. तर समोरचा व्यक्ती गप्प असेल. कामच करायाचे नाही तर टिका तर होणारच! त्यामुळे महापौर पद मोठे आहे. नशिबाने आरक्षणाचा लाभ मिळाला आहे. नसता नंबर लागणे आवघड असते. त्यामुळे विकासरुपी अभ्यास सतत करून विकास साधला पाहिजे. नेते मंडळी सतत मार्गदर्शन करीत असतात. निवडणुक काळात जाहिरनामा प्रसिद्ध केलेला असतो. त्याच्यानुसार क्रमवारीने विकास केला पाहिजे. कामाला लागल्यास आवघड काहीच नाही. त्यामुळे महापौरपदाची खुर्चीवर बसताच कशाचाही विचार न करता विकासाची कामे हाती घेतली पाहिजे. गावाचा विकास हा देशाचा विकास असतो. ही एक हाती आलेली मोठी संधी आहे. तीचे सोने केले पाहिजे. विकास करणे हीच खरी कसोटी आहे. इतरही नगरसेवकांचे मार्गदर्शन लाभते. सरकारी व्यक्ती जो आयुक्त असतो तेही मोठी शिकलेली मोठ्यापदाची व्यक्ती मार्गदर्शनक करीत असते. त्यामुळे महापौरानी पक्षीय राजकारण न करता जनतेचा विकास हा एकमेव विचार ठेवून काम केले पाहिजे. समस्या नवीन नसतात, त्याच त्या असतात किंवा आहेत. सर्वांना सोबत घेवून सोडविण्याचा विचार केला पाहिजे. महानगरपालिकेत महापौर अनेक दिवसांनी काही ठिकाणी विराजमान होत आहे. आता पदभार स्विकारणे बाकी आहे. प्रभाग विकास करण्याचे वचन नागरिकांना दिले आहे. सत्ताधारी असो किंवा विरोधक, विकास केला पाहिजे. तरच परत मतदार स्विकारेल. नसता मी माझ्याप्रयत्नाने निवडूण आलो असे जर म्हणत बसाल तर जनता काय करेल हे सांगणे नको. त्यामुळे प्रत्येक प्रभागाचा विकास साधणे ही महापौराबरोबर नगरसेवकांची जबाबदारी आहे. आता नगराचे सेवक आहोत. सेवक याचा अर्थ सर्वांना माहिती आहे. त्यामुळे सेवकासारखे वागले तर घराघरात नाव सतत राहाणार आहे. त्यामुळे महापौरापदी विराजमान होताच, विकासाची कामे हाती घेवून विकासाद्वारे छाप पाडण्याचा प्रयत्न व्हावा हीच अपेक्षा असून, हार्दिक शुभेच्छा!

# ‘हिंद दी चादर’ : त्याग आणि सर्वोच्च बलिदानाचा जिवंत अनुभव




पवित्र तखत सचखंड श्री हजूर अबचल नगर साहिब जी नांदेड गुरुद्वाराच्या पवित्र परिसरात भाविकांची मांदियाळी आहे. दर्शनासाठी रांगेत उभे असलेले भाविक केवळ नतमस्तक होत नाहीत, तर तिथे सुरू असलेल्या एका विशेष माहितीपटासमोर थबकतही आहेत. हिंद दी चादर गुरू तेग बहादूर साहिब जींच्या जीवनावरील हा माहितीपट पाहताना अनेकांची पावले तिथेच रेंगाळतायत.

संध्याकाळची वेळ... गोदावरीच्या तीरावर वसलेले सचखंड गुरुद्वारा विद्युत रोषणाईने लख्ख उजळून निघाले आहे. गुरुद्वाराच्या सुवर्ण कळसाचे प्रतिबिंब आणि रोषणाईचा प्रकाश यामुळे परिसर न्हाऊन निघाला आहे. हवेत लंगरचा आणि कडा प्रसादाचा तोच परिचित, पवित्र आणि मनाला तृप्त करणारा सुवास दरवळत आहे.

एकीकडे गुरुजींच्या गुरबानीचे मंगल सूर कानावर पडत आहेत, तर दुसरीकडे समोरच्या भव्य पडद्यावर श्री गुरू तेग बहादूर साहिब जींचा इतिहास जिवंत होत आहे. एरवी भाविकांच्या गजबजाटाने भरलेल्या या परिसरात आज एक वेगळीच, एकाग्रतेची शांतता आहे. तो भव्य डिजिटल पडदा केवळ प्रकाश फेकत नाहीये, तर त्या प्रकाशात ४०० वर्षांपूर्वीचा इतिहास उलगडत आहे. अंधारात चमकणारा तो पडदा आणि त्यावरचे प्रसंग पाहून, उपस्थित प्रत्येक जण सध्याच्या काळाचा विसर पडून त्या ऐतिहासिक कालखंडात हरवून गेला आहे.

या वातावरणात भारावून गेलेले भाविक जागचे हलत नाहीत. विशेषतः तरुण पिढीसाठी हा चित्रपट एक अनमोल ठेवा ठरत आहे. पडद्यावर जेव्हा श्री गुरु तेग बहादूर साहिब जींच्या सर्वोच्च बलिदानाचा प्रसंग येतो, तेव्हा उपस्थितांचे डोळे पाणावतात आणि आपसूकच हात जोडले जातात. भक्तीला तंत्रज्ञानाची जोड मिळाली की काय होते, याचा हा साक्षात पुरावा आहे. काळ बदलला, माध्यमं बदलली, पण श्री गुरू तेग बहादूर साहिब जींच्या त्यागाचा संदेश आजही शाश्वत आहे. हे दृश्य आणि हा अनुभव शब्दांत मांडण्यापलीकडचा आहे.

पवित्र तखत सचखंड श्री हजूर अबचल नगर साहिब जी नांदेड गुरुद्वारा, नांदेड वाघाळा येथील मैदानावर दोन दिवस चालणाऱ्या श्री गुरू तेग बहादूर साहिब जी यांच्या ३५० व्या शहीदी आणि श्री गुरू गोबिंद सिंघ जी ३५० व्या गुरता गद्दी शताब्दी समागम या ऐतिहासिक पर्वास आपणही सहकुटुंब एकदा नक्की भेट द्या.

पाहायला हवाच असा माहितीपट: https://www.youtube.com/watch?v=wškl87w6Nz-t=1s

**–डॉ. श्याम टरके ,**
**सहायक संचालक (माहिती)**
**विभागीय माहिती कार्यालय, लातूर**

# प्रजासत्ताक दिनानिमित्त सोमवारी पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या हस्ते ध्वजवंदन

**लातूर/प्रतिनिधी:** भारताच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त सोमवार, २६ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ९.१५ वाजता लातूर जिल्हा क्रीडा संकुल येथे मुख्य शासकीय राष्ट्रध्वज वंदन समारंभ होणार आहे. याप्रसंगी राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या हस्ते ध्वजवंदन होईल.

या कार्यक्रमास नागरिकांनी राष्ट्रीय पोषाखात समारंभ सुरु होण्यापूर्वी २० मिनिटे अगोदर आसनस्थ व्हावे. या मुख्य शासकीय कार्यक्रमास सर्वांना उपस्थित राहता, यावे यासाठी इतर सर्व कार्यालय, संस्था आदींनी त्यांचे ध्वजवंदनाचे समारंभ सकाळी ८.३० वाजेपूर्वी किंवा सकाळी १० वाजेनंतर आयोजित करावेत, असेही आवाहन करण्यात आले आहे.

# लातूर जिल्ह्यात प्रजासत्ताक दिनानिमित्त होणार ऐतिहासिक कवायत सादरीकरण

### सुमारे ५ हजार विद्यार्थ्यांचे राष्ट्रभक्तीपर गीतावर आधारित कवायत संचलन

**लातूर/प्रतिनिधी:** जिल्ह्यात २६ जानेवारी २०२६ रोजी प्रजासत्ताक दिनानिमित्त राष्ट्रभक्तीपर गीतावर आधारित भव्य कवायत सादरीकरणाचे आयोजन करण्यात आले आहे. लातूर जिल्हा क्रीडा संकुल येथे सकाळी जिल्हास्तरीय ध्वजवंदन कार्यक्रमानंतर सुमारे ५ हजार विद्यार्थ्यांचे एकत्रित कवायत संचलन सादर केले जाणार आहे. शहरातील विविध शाळांमधील विद्यार्थी या उपक्रमात सहभागी होत आहेत.

या कार्यक्रमास पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहूल कुमार मीना, शिक्षणाधिकारी माध्यमिक डॉ. दत्तात्रय मठपती, शिक्षणाधिकारी प्राथमिक तृप्ती अंधारे तसेच मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष प्रकाश देशमुख हे प्रमुख उपस्थित राहणार आहेत.

जिल्ह्यातील इतर नऊ तालुक्यांमध्ये देखील ध्वजवंदनानंतर स्वतंत्रपणे कवायत आयोजित करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील शासकीय, खासगी, अनुदानित व विनाअनुदानित शाळांमधून विद्यार्थी या उपक्रमात सहभागी होणार आहेत. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहूल कुमार मीना यांनी सर्व संबंधित अधिकाऱ्यांची बैठक घेऊन आवश्यक मार्गदर्शन केले.

# राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी, कर्मचाऱ्यांनी घेतली शपथ

**लातूर/प्रतिनिधी:** भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशांनुसार २५ जानेवारी २०२६ रोजी राष्ट्रीय मतदार दिन साजरा करण्यात येणार आहे. यानिमित्ताने आज जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या उपस्थितीत अधिकारी, कर्मचारी यांनी मतदार जागृतीची शपथ घेतली.

अपर जिल्हाधिकारी शिल्पा करमरकर, सामान्य प्रशासनाच्या उपजिल्हाधिकारी सायली ठाकूर, तहसीलदार संतोष बनकर, नायब तहसीलदार पंकज मंदाडे यांच्यासह अधिकारी, कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

वयाची अठरा वर्षे पूर्ण केल्यानंतर मतदार नोंदणी करणे आणि मतदान करणे हे आपले प्राथमिक कर्तव्य आहे. या वर्षी राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त भारत निवडणूक आयोगाने ‘माझा भारत, माझे मत’ ही थीम आणि ’भारतीय लोकशाहीच्या केंद्रस्थानी नागरिक’ ही टॅगलाइन जाहीर केली आहे. या थीमच्या अनुषंगाने २५ जानेवारी रोजी मतदार जागृतीसाठी विविध उपक्रम राबवावेत, तसेच प्रत्येक पात्र मतदाराने आपला मतदानाचा हक्क बजावावा. लातूर जिल्ह्यातील सर्व विभागीय अधिकारी, कर्मचारी आणि नागरिकांनी या राष्ट्रीय उत्सवात सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी यावेळी केले.

# तख्त सचखंड श्री हजूर अबचलनगर साहिब गुरुद्वारा येथे ३५० शालेय विद्यार्थ्यांच्या स्वरात दुमदुमली गुरबानी

### हिंद दी चादर गुरू तेग बहादूर साहिब जी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त कार्यक्रम



**नांदेड प्रतिनिधी:** हिंद दी चादर श्री गुरु तेग बहादर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षाचे औचित्य साधून, आज पवित्र तख्त सचखंड श्री हजूर अबचलनगर साहिब, नांदेड येथे एका भव्य आणि विशेष कीर्तन समागमाचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्याचे मुख्य आकर्षण म्हणजे ३५० शालेय विद्यार्थ्यांनी एका सुरात केलेले श्री गुरु तेग बहादूर साहिब जी यांच्या ’शब्द गुरबानी’चे गायन, ज्याने उपस्थित संगतांना मंत्रमुग्ध केले.

पवित्र तख्त सचखंड श्री हजूर अबचलनगर साहिब, नांदेड बोर्डाद्वारे आयोजित हा कार्यक्रम आज पार पडला. हिंद दी चादर श्री गुरु तेग बहादूर साहिब जी यांचे ३५० व्या शहीदी समागम वर्ष निमित्ताने, ३५० विद्यार्थ्यांनी त्यांना ही अनोखी स्वरांजली अर्पण केली.

या कार्यक्रमास तख्त सचखंड श्री हजूर अबचलनगर साहिब गुरुद्वाराचे जत्थेदार संत बाबा कुलवंत सिंघजी, बोर्डाचे प्रशासक डॉ. विजय सतबीर सिंघ (से. नि.भाप्रसे), हिंद दी चादर श्री गुरू तेग बहादूर साहिब जी यांच्या ३५० व्या शहीदी समागम राज्यस्तरीय समितीचे समन्वयक रामेश्वर नाईक, जसवंत सिंग बॉबी, गुरुद्वारा बोर्डाचे अधीक्षक हरजीत सिंघ जी कडेवाले आदींची उपस्थिती होती.

विद्यार्थ्यांच्या मुखातून बाहेर पडणाऱ्या गुरबानीच्या पवित्र स्वरांनी संपूर्ण तख्त सचखंड श्री हजूर अबचलनगर साहिब परिसर आणि वातावरण भक्तिमय झाले होते. या ऐतिहासिक आणि आध्यात्मिक सोहळ्याचे साक्षीदार होण्यासाठी भाविकांनी (संगत) मोठ्या संख्येने उपस्थिती लावली होती. शालेय मुलांच्या या शिस्तबद्ध आणि भावपूर्ण सादरीकरणाचे मान्यवरांनी कौतुक करत त्यांना मार्गदर्शन केले.

# हिंद-दी-चादर श्री गुरु तेग बहादूरजी : मनाचे श्लोक



शीख धर्माचे नववे गुरू श्री गुरू तेग बहादूरजी यांना संपूर्ण भारतात हिंद दी चादर (भारताचे संरक्षक) म्हणून ओळखले जाते. त्यांचे स्थान केवळ शीख इतिहासातच नाही, तर प्रत्येक भारतीयाच्या हृदयात आदराचे आहे. ते केवळ एक धार्मिक नेते नव्हते, तर मानवी सन्मान, श्रद्धा स्वातंत्र्याचे सर्वोच्च रक्षक होते. त्यांचे जीवन आणि कृती आपल्याला स्वतःच्या धर्मापलीकडे जाऊन मानवतेची मूल्ये कशी जपावीत, याबाबत शिकवते.

श्री गुरू तेग बहादूरजी असे योद्धे होते, की वयाच्या १४ व्या वर्षी मोगलांबरोबरच्या युद्धात त्यांनी अतुलनीय शौर्य गाजवले. तलवारीने शत्रूस कंठस्नान घातले. म्हणून त्यांचे नाव तेग बहादूर ठेवले गेले. तरीही पुढे अध्यात्मिक साधनेमुळे ते पूर्णपणे स्थिरमती बनले. सुख, दुःख, हर्ष, खेद यापासून मुक्त, असे मुक्तामा बनले. त्यांना ठार मारण्यासाठी आलेल्या मारेकऱ्यासही त्यांनी क्षमा केली, केवढे हे त्यांचे औदार्य आणि मनाची ताकद.

श्री गुरू तेग बहादूरजी यांचे पुत्र शीख धर्मियांचे दहावे आणि अंतिम देहधारी गुरू श्री गुरू गोबिंद सिंग जी. त्यांनी नांदेड येथे देह त्यागण्यापूर्वी त्यांच्यानंतर देहधारी गुरू असणार नाही, असे घोषित केले. पवित्र गुरू ग्रंथ साहिब यांना गुरूपद बहाल केले. या पवित्र गुरू ग्रंथ साहिबमध्ये श्री गुरू तेगबहादूर जी यांच्या ५९ पद्यांचा व ५७ श्लोकांचा अशा एकूण ११६ रचनांचा समावेश आहे.

पवित्र ग्रंथ श्री गुरू ग्रंथ साहिबचा प्रारंभ श्री गुरू नानकदेवांच्या जपुजी साहिब वाणीने झाला. तर हिंद-दी-चादर श्री गुरू तेग बहादूरजी यांच्या श्लोकांनी समारोप. पवित्र गुरू ग्रंथ साहिब एक हजार ४३० पानांचा आहे. पान क्रमांक एक हजार ४२५ ते एक हजार ४२८ यावर श्री गुरू तेगबहादूरजी यांचे मनाचे श्लोक अंकित आहेत. श्री गुरू तेगबहादूरजी (गुरूजी) यांच्या श्लोकांमध्ये साधकास परमेश्वर प्राप्तीसाठी मनाची कोणती अवस्था प्राप्त केली पाहिजे, याचे विवेचन आहे.

प्रस्तुत लेखात काही निवडक श्लोकांमधून मनास उपदेश, मोह, मायेपासून दूर जाणे, संस्कारित मन असणे अत्यावश्यक असल्याचे ज्ञान होते. आदर्श जीवन जगण्याची पद्धत समजते. गुरूजींच्या श्लोकांमधील विचार प्रत्येकाने आचरणात आणायलाच हवेत. त्यातून मानवाचे कल्याणच होणार. तसेच गुरूजींच्या वाणीतून जगाचे खरे स्वरूप, शाश्वत सत्य समजते.

माया किंवा मोह आपल्याला बांधून ठेवते, यावर श्री गुरू तेग बहादूरजींनी भाष्य केले आहे. त्यांच्या मते, जग आणि त्यातील सुख-दुःखे क्षणभंगुर आहेत.

जग रचना सभ झूठ है, जानि लेहु रे मीत ।।

कहि नानक थिरु ना रहे, जिउ बालू की भीत ।। ४९।।

अर्थ : गुरू नानक म्हणतात, मित्रा, हे जग नश्वर आणि अस्थिर आहे. ज्याप्रमाणे वाळूची भिंत टिकत नाही, तसेच हे जगही टिकणारे नाही.

जेव्हा आपल्याला हे सत्य समजते, तेव्हा आपण भौतिक मोहातून मुक्त होतो. ही समज आपल्याला सेवा आणि निःस्वार्थ कामाकडे वळवते.

श्री गुरू तेग बहादूरजींनी मानवी दुःखाची कारणे शोधली, त्यावर मात करण्याचा मार्ग दाखवला. त्यांची शिकवण संपूर्ण मनुष्य जीवनाचे कल्याण करणारी आहे.

१. मोह आणि अहंकारावर विजय

माणसाचा स्वार्थ, अहंकार त्याला सत्यापासून दूर नेतो. यावर विजय मिळवणारा माणूस स्वतःसोबत इतरांनाही तारतो.

जो प्राणी ममता तजै, लोभ मोह अहंकार ।।

कहु नानक आपन तरै, अउरन लेत उधार ।।२२।।

अर्थ : गुरू नानक म्हणतात, जो माणूस लोभ, मोह, माया, ममता आणि अहंकार या विकारांचा त्याग केला तो स्वत: तर भवसागर तरून जातोच, एवढेच नव्हे तर इतरांचाही तो उद्धार करतो.

२. लोभ, क्रोधाचा त्याग

लोभ आणि राग नातेसंबंधांना तडा देतात. ज्याला सुख-दुःखाचा स्पर्श होत नाही, तो साक्षात ईश्वराचे रूप असतो.

सुख दुखु जिह परसै नही, लोभु मोहु अभिमानु ।।

कहु नानक सुनु रे मना, सो मुरति भगवान ।।१३।।

अर्थ : गुरू नानक म्हणतात, ज्याला सुख-दुःख स्पर्शही करू शकत नाही, जो लोभ, मोह, अभिमान आदी विकारांपासून मुक्त आहे, तो जीव साक्षात ईश्वर स्वरूप आहे.




३. सुख-दुःखात स्थिर मन

आयुष्यात चढ-उतार येणारच. पण जो शत्रू आणि मित्र दोघांना समान मानतो आणि दुःखात खचत नाही, तोच खरा ज्ञानी.

हरखु सोगु जा कै नही, बैरी मीत समानि ।।

कहु नानक सुनि रे मना, मुकति ताहि तै जानि ।।१५।।

अर्थ : गुरू नानक सांगतात, ज्याला हर्ष, शोक वेगळे वाटत नाहीत, जो शत्रू मित्र यांना समान मानतो, जो जीव मुक्त झाला आहे, असे समज.

४. भक्ती आणि नामस्मरण

सर्व संकटांतून मुक्त होण्यासाठी गुरूजींनी ईश्वराच्या नावाचे स्मरण करण्याचा सोपा मार्ग सांगितला आहे.

राम नामु उरि मैं गहिओ, जा कै सम नहि कोइ ।।

जिह सिमरत संकट मिटै, दरसु तुहारो होइ ।।५७।।

अर्थ : अंत समयी गुरू नानकजी म्हणतात अरे मित्रा ! नामस्मरणमात्रे संकटे नष्ट होतात, आणि परमेश्वराचे-दर्शन होते ते रामनाम हृद्यात धारण कर. त्याच्या तोडीचे जगात अन्य काहीही नाही.

हिंद-दी-चादर श्री. गुरू तेग बहादूरजींनी त्यांच्या कृती आणि आचरणातून सर्वांना अनमोल विचार दिला. त्यांचा विचार अंगीकारणे, आचरणात आणणे प्रत्येकाचे आद्यकर्तव्य आहेच. ‘कहु नानक सुन रे मना’ या वाक्यांद्वारे गुरूजी मनाला वारंवार अनेक दुष्कार्यापासून आपणास परावृत करून सत्कार्याशी जोडण्याचा संदेश देतात. असे गोड अमृत सर्व मानवाने चाखावे.

काम, क्रोध, लोभ, मोह, अहंकार, मत्सर यापासून मुक्तता म्हणजेच आत्मशुद्धी, सत्संग प्रधानता, जीवननिष्ठेत विधायकतेबरोबर अनाग्रही निवृत्ती, प्रपंच आणि परमार्थ, नामस्मरण यांचा सुमेळ ही गुरूजींच्या वाणीतील वैशिष्ट्ये आहेत. त्यांचे विचार एका समाजापुरते नाहीत. तर ते सर्व मानव कल्याणाचे आहेत. मनाला संस्कारित करणारे आहेत. गुरूजींची वाणी सर्वांपर्यंत पोहोचावी. आजच्या काळात त्यांच्या विचारांचे, शिकवणीचे अनुकरण ही काळाची गरज आहे. ते अमृत प्रत्येकाने चाखल्यास जीवनाचे नक्की सार्थक होईल.

**–डॉ. श्याम टरके,**
**सहायक संचालक (माहिती),**
**विभागीय माहिती कार्यालय, लातूर**

# जीवनात आनंदी कसे राहायचे?

नियमित व्यायाम – प्रेमानंद महाराज म्हणतात, व्यायाम केवळ तुमच्या शरीरासाठीच नाही तर तुमच्या मानसिक आरोग्यासाठी देखील चांगला आहे. यामुळे ताण, चिंता आणि नैराश्य कमी होण्यास मदत होते आणि आनंदाचे हार्मोन्स वाढतात. दररोज काही मिनिटे फिरायला जाणे किंवा हलके स्ट्रेचिंग करणे आवश्यक आहे. हळूहळू, ते तुमच्या दैनंदिन दिनचर्येचा एक भाग बनेल आणि तुम्हाला त्याचे परिणाम जाणवू लागतील.

भरपूर झोप – प्रेमानंद महाराज म्हणतात, चांगली झोप ही निरोगी जीवनाचा पाया आहे. प्रौढांनी दररोज रात्री किमान ७ तास झोप घेतली पाहिजे. पुरेशी झोप मेंदूचे कार्य सुधारते, मनः स्थिती स्थिर करते आणि शरीराला पुनरुज्जीवित करते. जर तुम्हाला दिवसा झोप येत असेल किंवा लक्ष केंद्रित करण्यात अडचण येत असेल, तर तुमच्या शरीराला अधिक विश्रांतीची आवश्यकता असल्याचे ते लक्षण असू शकते.

भरपूर झोप – प्रेमानंद महाराज म्हणतात, चांगली झोप ही निरोगी जीवनाचा पाया आहे. प्रौढांनी दररोज रात्री किमान ७ तास झोप घेतली पाहिजे. पुरेशी झोप मेंदूचे कार्य सुधारते, मनः स्थिती स्थिर करते आणि शरीराला पुनरुज्जीवित करते. जर तुम्हाला दिवसा झोप येत असेल किंवा लक्ष केंद्रित करण्यात अडचण येत असेल, तर तुमच्या शरीराला अधिक विश्रांतीची आवश्यकता असल्याचे ते लक्षण असू शकते.

जीवनात

सकारात्मकता आणण्याचा सर्वात सोपा मार्ग आहे. दररोज ज्या छोट्या छोट्या गोष्टी तुम्हाला आनंद देतात, जसे की हसणे आणि एखाद्याला

कृतज्ञता – प्रेमानंद महाराज म्हणतात, कृतज्ञता हा तुमच्या जीवनात सकारात्मकता आणण्याचा सर्वात सोपा मार्ग आहे. दररोज ज्या छोट्या छोट्या गोष्टी तुम्हाला आनंद देतात, जसे की हसणे आणि एखाद्याला नमस्कार म्हणणे किंवा मित्राला मदत करणे, याबद्दल कृतज्ञता व्यक्त करा. कालांतराने, ही पद्धत तुमची विचारसरणी बदलेल आणि तुम्ही तुमच्या आयुष्यातील चांगल्या गोष्टींवर अधिक लक्ष केंद्रित कराल.

प्रेमानंद महाराजांसोबत झालेल्या भेटीत एका भक्ताने त्यांना आनंदी कसे राहायचे असे विचारले. यावर प्रेमानंद महाराजांनी स्पष्ट केले की जर तुम्ही ध्यान केले, परमेश्वराचे नाव जपले, खऱ्या शास्त्रांचा अभ्यास केला, तुमच्या पालकांची आणि वडिलांची सेवा केली आणि समाजात आनंद आणला तर तुम्हीही आनंदी राहू शकता.

प्रेमानंद महाराजांसोबत झालेल्या भेटीत एका भक्ताने त्यांना आनंदी कसे राहायचे असे विचारले. यावर प्रेमानंद महाराजांनी स्पष्ट केले की जर तुम्ही ध्यान केले, परमेश्वराचे नाव जपले, खऱ्या शास्त्रांचा अभ्यास केला, तुमच्या पालकांची आणि वडिलांची सेवा केली आणि समाजात आनंद आणला तर तुम्हीही आनंदी राहू शकता.

# भात खाल्ल्यानंतर झोप का येते?




भात खाल्ल्यानंतर झोप येणे (किंवा सुस्ती येणे) हे खूप सामान्य आहे, विशेषतः दुपारच्या जेवणात. याला वैद्यकीय भाषेत postprandial somnolence किंवा food coma म्हणतात. हे मुख्यतः भातातील उच्च ग्लायसेमिक इंडेक्स आणि कार्बोहायड्रेट्समुळे होते.

मुख्य कारणे

C*f* GI आणि रक्तातील साखरेची झेप – पांढरा भात हा (GI ७०–९०+) असलेला पदार्थ आहे. तो पटकन पचतो आणि ग्लुकोजमध्ये बदलतो. याने रक्तातील साखर वेगाने वाढते आणि शरीरात इन्सुलिनची मोठी मात्रा तयार होते.

इन्सुलिन आणि ट्रिप्टोफानचा खेळ– इन्सुलिनमुळे इतर अनेक अमिनो ॲसिड्स स्नायूंमध्ये जातात, पण ट्रिप्टोफान मात्र रक्तात राहतो. हा ट्रिप्टोफान मेंदूत सहज पोहोचतो. तिथे **सेरोटोनिन आणि नंतर मेलाटोनिन** तयार होतो. हे दोन्ही हार्मोन्स आराम आणि झोप आणतात.

पचन प्रक्रिया आणि ऊर्जा वाटप– जेवणानंतर पचनासाठी शरीर बरेच रक्त पोटाकडे पाठवते. मेंदू आणि स्नायूंना कमी ऊर्जा मिळते आणि सुस्ती येते.

इतर घटक

जास्त प्रमाणात भात खाल्ल्यास (ओव्हरईटिंग).

कमी प्रोटीन/फायबर असलेले जेवण.

दुपारच्या वेळी नैसर्गिकरित्या शरीरात झोप येण्याची लाट येते.

फायदे (काही प्रमाणात)

झोप चांगली येऊ शकते: संशोधनानुसार हळसह–GI जेवण (उदा. भात) रात्री ४ तास आधी घेतल्यास झोप लवकर लागते आणि झोपेची गुणवत्ता सुधारते.

आरामदायक वाटते: तणाव कमी होऊन मन शांत होते (सेरोटोनिनमुळे).

रात्री भात खाल्ल्यास झोप चांगली येऊ शकते (काही लोकांसाठी).

नुकसान / तोटे

दिवसा कामावर परिणाम: ऑफिस/अभ्यासात सुस्ती, एकाग्रता कमी होते.

रक्तातील साखरेची घसरण: पुन्हा भूक/चिडचिड.

वजन वाढण्याची शक्यता: जास्त कार्ब्स + इन्सुलिन = फॅट स्टोरेज.

डायबिटीज/इन्सुलिन रेझिस्टन्सचा धोका: रोज जास्त प्रमाणात पांढरा भात खाल्ल्यास (विशेषतः कमी व्यायाम असल्यास).

पोषणाची कमतरता: फक्त भात–वरवरचे जेवण असल्यास प्रोटीन, फायबर, व्हिटॅमिन्स कमी पडतात.

योग्य पद्धत (झोप टाळण्यासाठी / संतुलित खाण्यासाठी)

प्रमाण नियंत्रित करा– १ छोटी वाटी (किंवा १००–१५० ग्रॅम शिजलेला) भात पुरेसा.

संतुलित थाळी बनवा (५०% भाज्या/फायबर + २५% प्रोटीन + २५% कार्ब्स).

प्रोटीन: डाळ, पनीर, अंडी, चिकन, मासे.

फायबर: हिरव्या भाज्या, कोशिंबीर, सॅलड.

ब्राउन राइस / लाल तांदूळ घ्या – ऋख कमी, फायबर जास्त. साखरेची झेप मंदावते.

भात थंड करून खा (उदा. आधी शिजवून थंड करा, नंतर गरम करा) याने ीशीळींीरपीं ीरीलह वाढते आणि कमी होते.

दुपारच्या जेवणानंतर ५–१० मिनिटे चालणे.

पाणी/बटरमिल्क जास्त प्या.

गोड किंवा जास्त तेलकट टाळा.

रात्री भात ठीक आहे जर तुम्हाला लवकर झोप हवी असेल. भात खाल्ल्यानंतर झोप येणे हे सामान्य आहे आणि मुख्यतः कार्ब्स + इन्सुलिन + ट्रिप्टोफान यामुळे होते. ते पूर्णपणे वाईट नाही, पण संतुलित प्रमाणात आणि सही साथीदार पदार्थांसोबत खाल्ल्यास फायद्याचे ठरते. जर रोज खूप जास्त सुस्ती येत असेल तर डॉक्टर/डायटिशियनचा सल्ला घ्या (थायरॉईड, ॲनिमिया, डायबिटीज तपासून पहा).

अस्वीकारण: हा लेख सामान्य माहितीवर आधारित आहे. वेबदुनिया याची पुष्टी करत नाही.

# कोणाचे कल्याण?



महापालिका निवडणुकीत शिंदे गटास हव्या तेवढ्या जागा भाजपने दिल्या नाहीत. शिंदे गटाचे अनेक उमेदवार भाजपमुळे पराभूत झाले. त्यामुळे भाजपला महापौरपद मिळू नये यासाठी नवी युती आकाराला आली हे स्पष्ट आहे.

महाराष्ट्रात नुकत्याच पार पडलेल्या महापालिका निवडणुकांमध्ये अनेक पक्ष, गट कोठे एकत्र आले, तर कोठे परस्परांविरुद्ध लढले. आपण कोणास व कशासाठी मत दिले हे मतदारांना अजूनही नीट उमगलेले नाही. राज्यात सत्तेत असलेल्या महायुतीतील पक्षही कोठे एकत्र, तर कोठे स्पर्धक होते. त्यातही भारतीय जनता पक्ष आणि एकनाथ शिंदे यांची शिवसेना यांच्यातील स्पर्धा विशेष लक्षणीय होती. महापौर पदाच्या आरक्षणाची सोडत जाहीर झाली आहे. सर्व २९ शहरांमध्ये त्या आधीच महापौरपद मिळवण्यासाठी रस्सीखेच सुरू झाली होती. मुंबई, ठाणे आणि कल्याण–डोंबिवली या शहरांचे महापौरपद मिळवण्यासाठी या दोन पक्षांत विशेष चुरस दिसत आहे. युतीतील अन्य पक्ष म्हणजे अजित पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेस, त्यास येथे

काहीच स्थान नाही. कल्याण–डोंबिवलीत या चुरशीस एक नवा पैलू मिळाला. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने शिंदे यांच्या गटास पाठिंबा जाहीर केला आहे. त्यामुळे महापौरपदावर दावा करण्यासाठी शिंदे गटाची बाजू बळकट झाल्याचे दिसते. भाजपची त्याने पंचाईत झाली आहे. शिंदे गटास शह देण्यासाठी ठाणे व कल्याण–डोंबिवलीत विरोधी बाकांवर बसण्याचा इशारा भाजपने दिला आहे. या राजकीय घडामोडींचा परिणाम मुंबई महापालिकेच्या सत्ता समीकरणावर होऊ शकतो.

बंधूंच्या युतीचे काय?

राज्यातील महापालिका निवडणूक 'महायुती'ने लढवल्या असल्या तरी काही शहरांत त्या तीन पक्षांत 'मैत्रीपूर्ण लढती' झाल्या. पुणे, पिंपरी–चिंचवड ही त्याची ठळक उदाहरणे. या दोन शहरांत राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांना अपयश आले. येथे महापौरपदावर किंवा सत्तेवर भाजप एकट्यानेच दावा करेल, कारण त्यांच्या बाजूने संख्याबळ आहे; पण कल्याण–डोंबिवलीत स्थिती वेगळी आहे. १२२ सदस्यांच्या महापालिकेत शिंदे गटास ५३ व भाजपला ५० जागा मिळाल्या. उद्धव यांच्या शिवसेनेस ११ व मनसेला ५ जागा मिळाल्या. काँग्रेसला २ व शरद पवार यांच्या गटास केवळ एक जागा मिळाल्याने हे पक्ष नगण्य आहेत.

मनसेचे पाच व उद्धव यांच्या सेनेच्या चार सदस्यांनी आपल्याला पाठिंबा दिल्याचा शिंदे गटाचा दावा आहे. त्या आधारे ते बहुमतासाठी आवश्यक असलेली ६२ ही संख्या गाठू शकतात. महापालिकेत सर्वांत मोठा पक्ष असल्याचा दावा शिंदे गटाने कोकण विभागीय आयुक्तांसमोर दाखल केला, तेव्हा मनसेचे पाच सदस्यही उपस्थित होते. त्या आधी दोन्ही पक्षांच्या काही नेत्यांची व चर्चा झाली, मग मनसेने पाठिंबा जाहीर केल्याचे वृत्त आहे. उद्धव यांच्या गटातील जे चार जण या नव्या युतीत आले, त्यापैकी दोनजण मनसेचे होते; पण निवडणूक उद्धव यांच्या गटाच्या चिन्हावर लढवली. दोघांना शिंदे गटाने उमेदवारी नाकारली म्हणून ते उद्धव गटातर्फे लढले. एकनाथ शिंदे यांचे चिरंजीव हे भाजपतर्फे खासदार बनले आहेत. त्यांची ही मोट बांधण्यात महत्त्वाची भूमिका होती असे स्पष्ट झाले आहे. स्थानिक पातळीवर अशी युती होत असते, असे मनसेच्या एका नेत्याने मत व्यक्त केल्याचे वृत्त आहे. पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांना त्याची कल्पना होती काय? त्यांचा या युतीस आशीर्वाद आहे का? हे स्पष्ट झालेले नाही. या नव्या युतीने उद्धव यांच्या गटास धक्का बसला आहे हे निश्चित. कोकण भवनात त्यांचे केवळ सात सदस्य आले होते. दोनजण शिंदे गटात गेल्याचे व दोनजण मनसेत जाण्यास उत्सुक असल्याचे कळते. अठरा वर्षांनंतर उद्धव व राज ठाकरे एकत्र आले ते भाजप व महायुतीस रोखण्याच्या उद्देशाने. नव्या युतीने तो हेतूच विफल झाला आहे. महापालिका निवडणुकीच्या निकालानंतर राज व उद्धव यांनी ही लढाई चालूच राहील असे जाहीर केले होते; पण कल्याणमधील घडामोडींमुळे आगामी जिल्हा परिषद निवडणुकीत व त्यानंतर उद्धव–राज यांच्या युतीचे भवितव्य काय असेल? हा प्रश्न स्वाभाविकपणे उभा राहातो. राज यांच्या धरसोड वृत्तीमुळे उद्धव गट अधिक पेचात आल्याचे दिसते. राजकीय विचार, तत्त्व यापेक्षा 'आपले कल्याण' यास पक्ष व त्यांच्या कार्यकर्त्यांनी महत्त्व दिल्याचे नवी युती सांगत आहे.

## १ Doctor Tips सल्ला डॉक्टरचा



**साग**–सागात सर्व प्रकारच्या त्वचे करता लाभदायक न्यूट्रीशन असतात आणि मजेदार गोष्ट म्हणजे तुमचे शरीर त्या सर्व न्यूट्रीशन ला चमत्कारीक स्पंज प्रमाणे शोषुन घेतो. साग जसे की पालक, कोबी, ब्रोकोली आणि हिरवे सफरचंद निश्चितच आपण आपल्या दैनिक आहारात याचा समावेश करायला हवा. डाळींबतुम्ही डाळींब खाता? बरेच जण नाही खात पण त्यांना हे माहीत नाही की डाळींबात बरेचसे अँटीऑक्सीडेंट असतात जे आपल्याला दुस–या फळांमध्ये मिळत नाही. जेव्हा स्वस्थ त्वचेबद्दल आपण बोलतो तेव्हा कदापीही आपल्याला डाळींबाला विसरून चालणार नाही. **(क्रमश.)**

## २ Joke विनोद




बाबू – तुझे वडील किती वर्षाचे आहेत.

राजू – माझ्याच वयाचे आहेत.

बाबू – अरे पण हे कसं शक्य आहे.

राजू – का नाही शक्य? अरे मी जन्मलो, नि ते वडील बनले ना स!

## ३ Message संदेश




Santa's Morning workout
santa 2 doctor-apne kaha tha ki subah khelne se sehat thik rehti hai pr muje to koi fark nai pada?
doctor-konsa game khelteho?
santa-mobile mai snake wala .

## ४ Thought सुविचार



ज्याला शत्रू नसतात त्याला अनुयायी देखील नसतात.**– डॉन प्याट**

**संस्कृत सुभाषित**

**रसान्तराण्येकरसं यथा दिव्यं पयोऽश्नुते।**
**देशे देशे गुणष्वेव मवस्थास्त्वमविक्रियः।।**

**मराठीत अर्थ**

आकाशातून पृथ्वीवर एकाच प्रकारचे पाणी पडते, पण जमिनीवरील निरनिराळ्या ठिकाणी निरनिराळे रस पाण्यात मिसळतात. तसेच निर्गुण आणि निराकार परमेश्वर पृथ्वीवर वेगवेगळ्या अवस्थांत दिसतो.

# महाशब्दकोड्यांचा समाचार



### आडवे शब्द

१. खर्चात कपात
६. पुष्कट
९. पोटापुरता शिधा
११. प्रमाणपत्र
१२. विश्रांती
१४. गणगोत
१६. तात्काळ
१८. आपला देश
१९. मोठी चूल
२०. चोरी करणारा
२२. झाडलोट
२४. वाढलेला व्याप
२५. जरतारीचा मोर यावर नाचतो
२७. प्रयत्न
२८. घाव, प्रहार
२९. रोखलेली नजर
३१. संतोष, आनंद
३४. समुद्रकिनारा
३८. पुरुष
३९. शिव! शिव!
४०. नुसतीच भटकंती
४१. विशेष
४२. अत्यंत यातनामय अवस्था
४५. माळ, सर
४६. हात
४८. पर्जन्य
४९. फोडातील द्रव
५०. गप्पांची जागा
५२. वक्र
५३. पूर्ण भेदून जाणारे
५४. शरीर
५५. अरण्य, जंगल
५६. तीव्र, अत्यंत टोकदार
५७. दिवस
५९. अर्धांगवायू
६१. चर्चा
६३. कावळा
६४. थोडेसुद्धा, अल्पप्रमाण
६५. टोळीचा प्रमुख
६७. खिडकी
६९. मच्छर
७१. तातडीचे संदेशवहन करण्याचा नामशेष झालेला प्रकार
७३. हनुमान (ग्रा.)
७५. प्रेम, ममता
७७. हमाल
८१. सूर्याचे एक नाव
८२. ठोक, हाण!
८३. युक्ती
८४. नेता, पुढारी

### उभे शब्द

१. कपडालत्ता
२. टिंगल, टवाळी
३. केव्हा (ग्रा.)
४. शाश्वत, चिरंतन
५. सोन्या–चांदीचा व्यापारी
७. महाशिवरात्रीचा मराठी महिना
८. परस्पर
९. पुन्हा पुन्हा
१०. प्रगती, उन्नत
१२. विमान
१३. कच्चे राहिल्यास निरूपयोगी मृत्तिकापात्र
१५. निवासस्थान
१७. आत–बाहेर करण्याची चौकट
२१. दात
२३. वंशपरंपरागत अधिकार
२६. फळातील द्रव
२७. सामान्य
३०. तापापूर्वीचे शहारे
३२. माणूसकी
३३. धैर्य, हिंमतीचे काम
३५. मगज
३६. कडक, न दबणारे
३७. साहित्यातील नऊ भावना
४१. मीठाची चव
४२. नाकी दम आणणारा आकडा
४३. भरपूर रस असलेला
४४. वेडावाकडा
४५. परिस्थिती
४६. पळसाचा डिंक
४७. जन्म–मृत्यू
४८. मोदकाचे आच्छादान
५०. पत्र
५१. अभिप्राय
५३. नाविकदल
५५. मध्यरात्रीचा पाऊस
५८. विरोध, द्वेष
६०. आठवड्याचा दिवस
६२. चिकटून, जवळ
६६. अति तीव्र, जाळणारे
६८. माफी, दया
७०. दाताखालचा, मदतनीस
७२. महान
७४. कैकयीची दासी
७६. वेदना
७७. वजन
७८. सुंदर तरुणी, पत्नी
७९. शंकर
८०. शेवट

### आडवे उत्तरे

१.काटकसर ६.अमाप ९.पसाभार ११.परवाना १२.आराम १४.घरदार १६.तडकाफडकी १८.भारत १९.भट्टी २०.चोर २२.कोवारे २४.पसारा २५.पदर २७.सायास २८.वार २९.टक ३१.समाधान ३४.सागरतट ३८.नर ३९.हरहर ४०.वणवण ४१.खास ४२.नरकवास ४५.हार ४६.कर ४८.पाऊस ४९.लस ५०.टमटमनगरी ५२.वाकडा ५३.आरपार ५४.तन ५५.रान ५६.तीक्ष्ण ५७.वासर ५९.लकवा ६१.मसलत ६३.काक ६४.लवमात्र ६५.सरदार ६७.गवाक्ष ६९.डास ७१.तार ७३.हणमंत ७५.माया ७७.भारवाहक ८१.प्रभाकर ८२.मार ८३.करामत ८४.नायक

### उभे उत्तरे

१.कापडचोपड २.टर ३.कवा ४.सनातन ५.सराफ ७.माघ ८.परभारे ९.परतपरत १०.भरभराट १२.आकाशयान १३.मडके १५.दार १७.कीरवा २१.रद २३.वारसाहक्क २६.रस २७.साधारण ३०.कसकस ३२.मानवता ३३.साहस ३५.गर ३६.टणक ३७.नवरस ४१.खारट ४२.नऊ ४३.रसवान ४४.वाकडातिकडा ४५.हालहवाल ४६.कमरकस ४७.जननमरण ४८.पारी ५०.टपाल ५१.मत ५३.आरमार ५५.रातवा ५८.सवतासुभा ६०.वार ६२.लगत ६६.दाहक ६८.क्षमा ७०.सहाय्यक ७२.थोर ७४.मंथरा ७६.यातना ७७.भार ७८.वामा ७९.हर ८०.अंत

# चंदेरी दुनिया



## ओ रोमियोच्या ट्रेलर लाँचच्या वेळी नाना पाटेकर संतापले



मुंबई–जेष्ठ अभिनेता नाना पाटेकर हे त्यांच्या कठोर प्रोफेशनलिज्म आणि पंक्चुएलिटीसाठी चित्रपटसृष्टीत प्रसिद्ध आहेत. चित्रपटाचे शूटिंग असो, बैठक असो किंवा सार्वजनिक कार्यक्रम ते नेहमीच वेळेवर पोहोचण्याला प्राधान्य देत असतात. बुधवारी 'ओ रोमियो'च्या ट्रेलर लॉन्चला देखील त्यांनी ही पद्धत पाळली, मात्र यावेळी परिस्थिती थोडी वेगळी झाली. ७५ वर्षीय ज्येष्ठ अभिनेता दुपारी १२ वाजता एका मल्टिप्लेक्समध्ये आयोजित असलेल्या 'ओ रोमियो'च्या ट्रेलर लॉन्चमध्ये टाईमवर उपस्थित राहिला. आता सोशल मीडियावर व्हिडिओ व्हायरल झाला आहे, यामध्ये अभिनेता सभागृहातून बाहेर पडून लिफ्टकडे जाताना दिसत आ-हेत. याशिवाय कार्यक्रमाचे आयोजक त्यांना थांबवण्याचा आणि समजावण्याचा प्रयत्न करत आहे. मात्र नाना कोणाचेही ऐकण्यास तयार नाहीत.

नाना पाटेकरला आला राग : व्हिडिओमध्ये नाना त्यांच्या घडीकडे रागानं बोट दाखवत, आयोजकांशी काहीतरी बोलताना दिसत आ-हेत, जणू काही ठरलेल्या वेळेचा आदर केला गेला नाही, असं या व्हिडिओवरून सिद्ध होतं आहे. तसेच आणखी एका क्लिपमध्ये नाना हा लिफ्टजवळ उभा असल्याचा दिसत आहे. यामध्ये त्यांनी तिथून जाण्याचा निर्णय घेतल्याचं हे स्पष्ट होतं आहे. आता या व्हिडिओवरून हे सिद्ध होते की, नाना कधीही वेळेशी आणि शिस्तीशी तडजोड करत नाहीत. नानांच्या जाण्यानंतर, दिग्दर्शक विशाल भारद्वाज यांनी ट्रेलर लाँच कार्यक्रमात उघडपणे खुलासा केला की , अभिनेता निघून गेला. विशालच्या म्हणण्यानुसार, नाना स्पष्टपणे म्हणाले, ''तुम्ही मला एक तास वाट पाहायला लावली, मी जात आहे.'' कार्यक्रमात उपस्थित असलेल्यांच्या मते, चित्रपटाचे दोन मुख्य कलाकार, शाहिद कपूर आणि तृप्ती डिमरी, नाना गेल्यानंतर दुपारी १:३० च्या सुमारास कार्यक्रमस्थळी पोहोचले.

नाना पाटेकरचे व्यक्तिमत्व : नानाच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल बोलताना विशाल भारद्वाज यांनी वर्णन मनोरंजक पद्धतीने केलं. त्यांनी सांगितलं की ''नाना निघून गेले आहे, मात्र अजूनही त्यांच्यासाठी काहीतरी बोलणे आवश्यक आहे. नानाचा स्वभाव एका खोडकर शाळकरी मुलासारखा आहे, जो वर्गात सर्वांना त्रास देतो, सर्वात जास्त मनोरंजन करतो आणि त्यांच्या जवळ सर्वांना राहायला आवडते. नानाचा हाच खरा स्वभाव आहे.'' विशालच्या विधानामुळं नक्कीच तेथील वातावरण चांगलं झालं असणार, मात्र नानांच्या नार-ाजीचे कारण स्पष्ट आहे. दरम्यान 'ओ रोमियो'चे निर्माते असा दावा करतात की, हा खऱ्या घटनांनी प्रेरित एक रोमँटिक ॲक्शन ड्रामा आहे, जो प्रेक्षकांना एक रोमांचक सिनेमॅटिक अनुभव देण्याचे आश्वासन देतो. चित्रपटात शाहिद कपूर एका क्रूर गुंडाच्या भूमिकेत दिसणार आहे. याशिवाय चित्रपटामध्ये तृप्ती डिमरी आणि नाना पाटेकर यांच्या व्यतिरिक्त, अविनाश तिवारी, दिशा पटानी, फरीदा जलाल, अरुणा इराणी आणि विक्रांत मेस्सी यांच्याही विशेष भूमिका आहेत. तसेच तमन्ना भाटिया देखील चित्रपटात एका महत्वाच्या भूमिकेत दिसणार आहे. साजिद नाडियाडवाला निर्मित 'ओ रोमियो' १३ फेब्रुवारी २०२६ रोजी व्हॅलेंटाईन डे दरम्यान थिएटरमध्ये प्रदर्शित होणार आहे.

## मी आधीच गौरीशी लग्न..आमिर खान तिसऱ्यांदा बोहल्यावर चढणार?

### गौरीसोबतच्या नात्याबाबत नेमके काय म्हणाला?



मुंबई–बॉलिवूडचा मिस्टर परफेक्शनिस्ट बऱ्याचदा त्याच्या वादग्रस्त विधानांमुळे चर्चेत असतो. कधी विधानांमुळे तर कधी तो वैयक्तिक आयुष्यामुळे प्रकाशझोतात असतो. आमिर खान या आधी दोन लग्नावरून चर्चेत आला आहे. मात्र, तो पुन्हा तिसऱ्यांदा बोहल्यावर चढणार असल्याची चर्चा आहे. आमिर खान आणि गौरी स्प्राट यांचे नाते सर्वज्ञात आहे. ते दोघे एकमेकांना बऱ्याच काळापासून एकमेकांना डेट करत असल्याची माहिती आहे. दोघेही लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये राहत आहेत. दोघांच्याही कुटुंबियांना त्यांच्या या नात्याबाबत माहिती आहे. अलिकडेच त्याने एका मुलाखतीत, गौरीसोबत असलेल्या नात्याबद्दल खूप गंभीर असून, कमिटेड असल्याचं त्यानं स्पष्ट केलं. मुलाखतीत गौरीच्या नात्याबाबत आमिर खान नेमकं काय म्हणाला?

बॉलिवूड हंगामला दिलेल्या मुलाखतीत आमिर खान म्हणाला, ''गौरीसोबत असलेल्या नात्यात मी खूप गंभीर आहे. आम्ही दोघेही एकमेकांशी कमिटेड आहोत. आम्ही वाईट आणि चांगल्या परिस्थितीत एकमेकांची साथ देतो. खरं सांगायचं झाल्यास मी माझ्या मनातून गौरीशी लग्न केलं आहे. पुढे जाऊन आम्ही लग्न करू किंवा नाही, हे मला काही ठाऊक नाही.. परंतु, हे सत्य आहे. याबाबत मी फ्यूचरमध्ये नक्कीच निर्णय घेईन'', असं आमिर खानने स्पष्ट केलं.

'गेल्या २५ वर्षापासून आम्ही एकमेकांना ओळखत आहोत' ''आम्ही अनपेक्षितपणे भेटलो, नंतर संपर्कात राहिलो, पुढे सर्व काही घडत गेलं'', असंही आमिर खान म्हणाला. गेल्या वर्षी आपल्या ६० व्या वाढदिवसाच्या निमित्ताने त्यानं गौरीशी ओळख प्रसारमाध्यमांशी करून दिली होती. तेव्हा त्यानं, गेल्या २५ वर्षापासून एकमेकांना ओळखत असल्याचं स्पष्ट केलं. गौरी एका ६ वर्षाच्या मुलाची आई आहे. तिला बुद्धिमान आणि शांत स्वभावाचा जोडीदार हवा होता, तिला हे गुण आमिर खानमध्ये आढळून आल्याचं तिनं स्पष्ट केलं. गौरी आता आमिरच्या प्रॉडक्शन हाऊसमध्ये काम करत असल्याची माहिती आहे. दोघांचेही सध्या एकत्रित फोटो आणि व्हिडिओ सोशल मीडियात तुफान व्हायरल होत आहेत. दरम्यान, दो-घेही एकमेकांशी विवाह करणार का? हा प्रश्न सध्या नेटकरी उपस्थित करत आहेत.

## शाहिदचा ओ रोमियोरावडी अवतार समोर



मुंबई,जानेवारी–चॉकलेट बॉय शाहिद कपूरचा आगामी चित्रपट ओ रोमियोचा ट्रेलर आज प्रदर्शित झाला आहे. रक्ताने माखलेल्या ॲक्शन सीन्सने लोकांचे लक्ष वेधून घेतले आहे. या चित्रपटात शाहिद कपूरसोबत तृप्ती डिमरी मुख्य भूमिकेत दिसणार आहे. दोघांच्या लव्ह रिलेशनला या चित्रपटात एका खास पद्धतीने सादर करण्यात आले आहे. हा चित्रपट १३ फ ेब्रुवारी रोजी प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटात शाहीद कपूर, तृप्ती डिमरी याच्यासह अविनाश तिवारी देखील मुख्य भूमिकेत दिसणार आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन विशाल भारद्वाज यांनी केले असून, या चित्रपटाची प्रेक्षक उत्सुकतेने वाट पाहत आहेत. या चित्रपटाच्या ट्रेलरला प्रेक्षकांकडून भरभरून प्रतिसाद मिळत आहे. ट्रेलर अतिशय धमाकेदार आहे. या चित्रपटात शाहीद कपूरचा राऊडी अंदाज पाहायला मिळत आहे. शाहीद कपूर आणि तृप्ती डिमरी पहिल्यांदाच एकत्र स्क्रीन शेअर करत आहेत. दोघांची स्क्रीनवरील केमिस्ट्री भन्नाट आहे. या चित्रपटात शाहिद, तृप्ती आणि अविनाश यांच्यासोबत या चित्रपटात रणदीप हुड्डा, दिशा पटानी, नाना पाटेकर, फरीदा जलाल, शक्ती कपूर, राम कपूर आणि तमन्ना भाटिया यांच्याही भूमिका आहेत. तर, सान्या मल्होत्रा, विक्रांत मेस्सी, दिया मिर्झा, तनिषा मुखर्जी, तारा शर्मा आणि रोशनी वालिया या कलाकारांचीही प्रमुख भूमिका आहेत.

ट्रेलरमध्ये चित्रपटाच्या कथेची झलक दिसून येत आहे. शाहिद कपूर एका रक्तरंजित, ॲक्शन भूमिकेत दिसत आहे. ओ रोमियो या चित्रपटात केवळ ॲक्शन नसून रोमान्स देखील पाहायला मिळत आहे. ओ रोमिया या चित्रपटाच्या ट्रेलरला चांगला प्रतिसाद मिळत आहे. हा चित्रपट १३ फेब्रुवारी रोजी प्रदर्शित होणार आहे. ओ रोमियो या चित्रपटाची कथा हुसैन उस्तरा नावाच्या गुंडाच्या जीवनावर आधारीत आहे. जो एकेकाळी मुंबईवर राज्य करीत होता. हुसैन उस्तराची दाउद इब्राहिमसोबत वैर होते. हा गुंड त्याच्या क्रुरतेसाठी ओळखला जात होता. लेखक हुसैन जैदी यांनी डोंगरी टू दुबई या सिरीजमधून त्याची माहिती दिली. यात त्यांनी स्पष्ट केले की, हुसैन उस्तरा याने १६ व्या वर्षी गुन्हेगारी जगतात पाऊल ठेवलं होतं. दरम्यान, किरकोळ गुन्हे केल्यानंतर तो अंडर्लूडमध्ये फ ेमस झाला होता. मुंबईच्या पायधुनी भागात तो एकेकाळी राज्य करीत असल्याची माहिती

## जबरदस्त रिस्पॉन्स




मल्टीस्टारर चित्रपट बॉर्डर २ २३ जानेवारी रोजी प्रदर्शित झाला. चित्रपटाला जबरदस्त प्रतिसाद मिळत आहे. चित्रपटाने किती कमाई केली ते जाणून घेऊया. भारत २६ जानेवारी रोजी ७७ वा प्रजासत्ताक दिन साजरा करेल आणि सर्वत्र देशभक्तीचे वातावरण आहे. दरम्यान, बॉर्डर २ हा चित्रपट आज, २३ जानेवारी रोजी थिएटरमध्ये प्रदर्शित झाला आणि चित्रपट पाहिल्यानंतर देशभक्तीची भावना द्विगुणित झाली आहे. सनी देओल, दिलजीत दोसांझ, वरुण धवन आणि अहान शेट्टी अभिनीत या चित्रपटाला खूप सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. बॉर्डर २ पाहण्यासाठी लोक चित्रपटगृहांमध्ये गर्दी करत आहे. चित्रपट पाहिल्यानंतर प्रेक्षकांनी सोशल मीडियावर त्याचे कौतुक केले आहे.

## श्रिया पिळगावकरने शाहरुख खानबरोबरचा फोटो केला शेअर

### फॅन चित्रपटातील पदार्पणाची केली आठवण...



मुंबई–अभिनेत्री श्रिया पिळगावकरला नॉस्टॅल्जिक वाटले, तेव्हा तिनं २०१६च्या थ्रोबॅक व्हायरल ट्रेंडमध्ये भाग घेतला आणि त्या वर्षाच्या आठवणींना उजाळा दिला, ज्याचं वर्णन ती 'विश्वासाची उडी' असे करते, कारण शाहरुख खान अभिनीत 'फॅन' चित्रपटाद्वारे तिनं हिंदी चित्रपटसृष्टीत पदार्पण केलं होतं. इन्स्टाग्रामवर, श्रियानं २०१६ हे वर्ष शाहरुख खान अभिनीत 'फॅन' चित्रपटाद्वारे तिच्या हिंदी चित्रपट पदार्पणाचे वर्ष म्हणून आठवले, जो एक महत्त्वाचा टप्पा होता. यानंतर तिच्या नवीन स्वप्नांची सुरुवात झाली होती. याशिवाय तिनं तिच्या प्रिय आजोबांना भूमध्य सागरी क्रूझवर घेऊन जाण्याच्या आणि रंगभूमीवर काम करण्यात वेळ घालवण्याच्या आठवणीही शेअर केल्या आहेत. तिनं शाहरुख खान, हर्षवर्धन राणे, ईशान खट्टर आणि दिवंगत अभिनेते धर्मेंद्र यांच्याबरोबरचे, तसेच तिचे वडील सचिन पिलगावकर यांच्यासोबतचे अनेक फोटो सोशल मीडियावर शेअर केले आहेत.

श्रिया पिलगावकरची पोस्ट : श्रियानं तिच्या या पोस्टच्या कॅप्शनमध्ये लिहिलं, ''२०२६ च्या थ्रोबॅक ट्रेंडमध्ये सामील होत आहे. इन्स्टाग्राम खरोखरच एका डिजिटल स्क्रॅपबुकसारखे वाटते.'' तिनं आपल्या पोस्टमध्ये पुढं लिहिलं, ''काही खास आठवणी समोर आल्या...'फॅन' चित्रपटाद्वारे माझ्या हिंदी चित्रपट पदार्पणाचे वर्ष, माझ्या आजोबांना भूमध्य सागरी क्रूझवर घेऊन जाणे, खूप रंगभूमीवर काम केले आणि हळूच विश्वासाची उडी घेण्याचे धैर्य मिळवले, कारण स्वप्ने हळूहळू आकार घेऊ लागली होती. तेव्हाही मी एक शोधक होते आणि आजही आहे.'' मनीष शर्मा दिग्दर्शित 'फॅन' या ॲक्शन थ्रिलर चित्रपटाबद्दल बोलायचं झालं तर , या चित्रपटामध्ये शाहरुख खान दुहेरी भूमिकेत दिसला आहे. या चित्रपटात वालुशा डी सूझा, सयानी गुप्ता, योगेंद्र टिक्कू, परवीन कौर, ताहेर शब्बीर आणि इंद्रनील भट्टाचार्य यांच्यासह इतर कलाकारांनीही काम केलं आहे.

श्रिया पिलगावकरचं वर्कफ्रंट : श्रिया सध्या प्रियदर्शन यांच्या 'हैवान' चित्रपटात काम करत आहे. या चित्रपटाचे शूटिंग यावर्षी ऑगस्टमध्ये सुरू झाले. 'हैवान' चित्रपटाद्वारे बॉलिवूड सुपरस्टार अक्षय कुमार आणि सैफ अली खान १८ वर्षानंतर एकत्र दिसणार आहे. सैफ आणि अक्षय हे शेवटी 'टशन' या चित्रपटात एकत्र दिसले होते. हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर अयशस्वी ठरला होता. दरम्यान, प्रियदर्शन आणि अक्षय कुमार 'भूत बंगला' नावाच्या एका प्रोजेक्टवर काम करत आहेत. हा हॉरर ड्रामा २०२५च्या अखेरीस प्रदर्शित होण्याची शक्यता आहे. या चित्रपटाद्वारे हिंदी चित्रपटसृष्टीतील सर्वात यशस्वी अभिनेता–दिग्दर्शक जोड्यांपैकी एक असलेल्या अक्षय कुमार आणि प्रियदर्शन पुन्हा एकत्र येत आहे. श्रियाबद्दल सांगायचं झालं तिनं २०१३ मध्ये 'एकुलती एक' या मराठी चित्रपटातून अभिनयात पदार्पण केलं होतं, ज्यासाठी तिला सर्वोत्कृष्ट पदार्पणाचा महाराष्ट्र राज्य चित्रपट पुरस्कार मिळाला. याशिवाय अभिनेत्रीनं 'गिल्टी माइंड्स', 'द ब्रोकन न्यूज' 'इश्क–ए–नादान' 'मिर्झापूर' आणि 'ताझा खबर' सारख्या यशस्वी वेब सीरीजमध्ये काम केले आहे.

## तुम प्रेम के पंछी हो...

प्रेम, बंधुभावाचा संदेश देणारे महम्मद रफी यांच्या स्वरातील 'देशप्रेमी'(१९८२) मधील हे गीत रुपेरी पडद्यावर खूप गाजले.बर्याचदा चित्रपट माध्यमाद्वारे करमणुकी सोबत सामाजिक संदेश देण्याचा विचार होतो. जेणेकरून समाजाला योग्य दिशा मिळेल, मानवी जीवन सुसह्य होईल; पण असे संदेश हाणामारी, बाष्फळ विनोद आणि भडक नृत्यांच्या व्यावसायिक गणितात झाकोळून जातात आणि समाज या माध्यमाला तद्दन करमणुकीच्या तराजूतच तोलतो. तरीही प्रबोधनाचे प्रयत्न वारंवार होतात.

जशी वनस्पती आणि प्राण्यांमध्ये भौगोलिक परिस्थितीनुसार वैविध्यता तशीच मानवांत धर्म, वर्ण, भाषा, चालीरीतींची वैविध्यता असते. मूळ नैसर्गिक भावना एकच असली तरी, आविष्कारात फरक पाहायला मिळतो. आपल्या संविधानात विविधतेत एकता; पण प्रत्यक्षात मात्र विषमतेचाच व्यवहार दिसतो. माणूसच माणसाचा वैरी झाला आहे. प्रत्येकाच्या मनात असणार्या इतरांबद्दलच्या अढीची अनेक प्रकारे वर्गवारी होऊन हळूहळू तिचे द्वेषात रूपांतर झाले आहे. त्यामुळेच समाज विखुरलेला राहून 'माणूस' नावाचे हे बेट एकाकी होत आहे. त्याच्या सीमा देखील आकसत आहेत; पण हेच अमेरिकेसारख्या प्रगत आणि महासत्ता असलेल्या देशातही पाहायला मिळते. जिथे जगाच्या कानाकोपर्यातून चरितार्थासाठी विविध वंशांचे लोक स्थायिक झाले त्या सुशिक्षित समाजात देखील वर्णविद्वेष आहेच. याचे समर्पक चित्रण 'उीरीह' (२००४) ३ ऑस्कर पुरस्कार विजेत्या पॉल हॅगीस दिग्दर्शित चित्रपटात पाहायला मिळते.

या कथेत पात्रे भरपूर. त्यांची प्रत्येकाची पार्श्वभूमी, स्वभाव वैशिष्ट्ये वेगवेगळी आहेत आणि ती सर्व कारचोरी आणि कार अपघाताच्या घटनांनी एकमेकांसमोर उभी ठाकतात. लॉस एंजेलिसमध्ये, ग्रहम वॉटर्स (डॉन शिएडल) हा कृष्णवर्णीय डिटेक्टिव्ह आपली लॅटीन अमेरिकन सहकारी रियाच्या (जेनीफर एपोसीतो) प्रेमात आहे. एकदा दोघे एकत्र गस्त घालताना त्यांच्या गाडीची चिनीवंशी किम लीच्या कारशी किरकोळ टक्कर होते. रिया आणि किम ली एकमेकींशी वांशिक अपमानाची शाब्दिक देवाणघेवाण करतात.

त्याचवेळी वॉटर्सचा कारचोर भाऊ पीटर त्याचा मित्र अन्थनी (लुडाक्रीस) च्या साथीने श्वेतवर्णीय वकील कॉबेट्स (ब्रँडन फ्रेझर) आणि त्याची पत्नी जीन (सँड्रा बुलॉक) यांना धमकावून त्यांची कार चोरी करून पळून जातात. त्यामुळेच जीनच्या मनातील कृष्णवर्णीयांविषयीच्या तिरस्काराला खतपाणी मिळते.

पुढे जाता–जाता कंबोडियाच्या गरीब लोकांची अमेरिकेत मानवी तस्करी करणार्या चिनी व्यक्तीला(किम ली च्या नवर्याला) पीटर आणि अन्थनी चोरलेल्या गाडीने उडवतात.त्यानंतर वॉटर्स आणि रिया एका गुन्ह्याच्या ठिकाणी पोहोचतात, जिथे एका अनामिक व्यक्तीचा मृतदेह सापडतो. त्यानंतर चित्रपट ४८ तासांमागील घटनांची साखळी शोधतो.

दुसरीकडे वृद्ध वडिलांच्या आजाराने व्यथित पोलीस सार्जंट जॉन रायन (मॅट डिलन) एका गाडीला थांबवतो आणि विनाकारण आपल्या पदाचा गैरवापर करत त्यातील कृष्णवर्णीय टीव्ही दिग्दर्शक कॅमेरॉन आणि पत्नी क्रिस्टीन (थेन्डी न्यूटन) हे दोघे अश्लील चाळे करत होते असा आरोप करत पती समोरच क्रिस्टीनची अंगझडती घेऊन तिचा विनयभंग करत खदखद व्यक्त करतो. रायनचा सहकारी टॉम हॅन्सन यात हस्तक्षेप करत नाही; पण नंतर कृष्णवर्णीय वरिष्ठ डिक्सनकडे रायनची तक्रार करून बदलीची विनंती करतो. वर्णभेदाच्या तक्रारीमुळे त्याच्या कारकीर्दीला नुकसान होऊ नये म्हणून आणि रायनच्या वर्तनाचा उल्लेख टाळण्याच्या अटीवर डिक्सन बदलीची परवानगी देतो.

त्याचवेळी श्वेतवर्णी डिटेक्टिव्ह काँकलिनने एका कृष्णवर्णी डिटेक्टिव्ह लुईसवर गोळी झाडली; पण लुईस ड्रग्ज व्यवहारात सामील

> **नफरत की लाठी तोडो,**
> **लालच का खंजर फेंको,**
> **जिद के पीछे मत दौडो,**
> **तुम प्रेम के पंछी हो देशप्रेमियों,**
> **आपस मे प्रेम करो देशप्रेमियों।**

असल्याचे पुरावे असूनही अंतर्गत व्यवहार विभाग काँकलिनला तुरुंगात टाकू इच्छितात. म्हणून, अनिच्छेनेच पण दबावाखाली त्याच्या भावाचा पीटरचा गुन्हेगारी रेकॉर्ड साफ करण्याचे आश्वासन घेत पत्रकार परिषदेत वॉटर्स ही हत्या वांशिकतेमुळेच प्रेरित असल्याचे कबूल करतो.

तर ९/११ च्या दहशतवादी हल्ल्यामुळे सर्वत्र संशयिताचे जीणे वाट्याला आलेल्या आणि स्वसंरक्षणासाठी जागरूक असा इराणी दुकानदार फरहाद आपल्या दुकानात चोरी केल्याप्रकरणी कुलुपे दुरुस्त करणार्या दक्षिण अमेरिकी डॅनियलवरच संशय घेऊन त्याच्यावर गोळी झाडतो; पण डॅनियलची मुलगी एलिझाबेथ मध्येच आल्याने तिला गोळी लागते. त्यानंतर घाबरून फरहाद कुटुंबासह पळून जातो आणि शेवटी जेव्हा वॉटर्स आणि रिया नंतर घटनास्थळी पोहोचतात आणि मृत शरीर वॉटर्सचा भाऊ पीटरचे असल्याचे उघड होते. ज्याला हॅन्सनने पकडून गैरसमजातून गोळी झाडून मारले होते आणि नंतर त्याचा मृतदेह आणि कार एका झुडुपात लपवून त्याची कार जाळलेली असते.अशा प्रकारे निरनिराळ्या वंशांच्या विविध पात्रांचे जीवनाचे धागे ४८ तासांत घडणार्या अपघाती घटनांमधून जोडले जातात. कथा वर्णभेद आणि पूर्वग्रहांच्या गुंतागुंतीच्या जाळ्याभोवती फिरते. पात्र त्यांच्या पूर्वग्रहांनुसार वागतात आणि त्यांच्या कृतींचे परिणामही अनुभवतात.



सामाजिक ताणतणाव आणि मानवी संबंधांचे हृद्य चित्रण येथे पहायला मिळते. जसे आजारी वडिलांना आरोग्य विमा लवकर मिळत नाही म्हणून, रायन विमा समायोजिकेला तिच्या क्षमतेचा अपमान करून म्हणतो की, तू एका अधिक पात्र गोर्या पुरुषाची नोकरी गिळलीस. वर्णद्वेषाने ग्रस्त जीन आपल्या मेक्सिकन नोकराणीला नेहमी अपमानित करीत असते.तशीच मानवतेच–ीही बाजू दाखवण्यात आली आहे. आपघातात जखमी केलेल्याला अँथनी आणि पीटर उपचारासाठी हॉस्पिटलसमोर सोडतातही. तर रायन जीवावर उदार होऊन अपघातातून क्रिस्टीनचा जीव वाचवतो. गुन्हेगार ॲन्थनी उपरती होऊन मानवी तस्करीतील कंबोडियाच्या बंधकांना किम लीच्या बंधनातून मुक्त करतो.गतवर्षीच्या सर्वोत्कृष्ट चित्रपटाचे ऑस्कर मिळवणार्या 'मिलीयन डॉलर बेबी'चा पटकथाकार पॉल हॅगीसचा वैयक्तिक अनुभवातून साकारलेला हा पहिलाच दिग्दर्शकीय प्रयत्न. तरीही 'क्रश' ने ६ नामांकनांपैकी सर्वोत्कृष्ट चित्रपट, सर्वोत्कृष्ट पटकथा आणि सर्वोत्कृष्ट संकलन असे ३ ऑस्कर पुरस्कार मिळवले. सर्वोत्कृष्ट चित्रपट पुरस्काराबाबत रसिकांमध्ये थोडी नाराजी होती. कारण स्पर्धेत स्पिलबर्गचा 'म्युनिक', आंग ली चा 'ब्रोकबक माऊंटेन', जॉर्ज क्लुनीचा 'गुड नाइट अँड गुड लक', बेनेट मिलरचा 'कपोत' असे दमदार चित्रपट होते; पण शेवटी जो जीता वही सिकंदर. पाल हगीस सलग दोन वर्षे पटकथेचा पुरस्कार मिळवणारा पहिला आणि एकमेव लेखकही ठरला. तसेच जगभरातून १०० पेक्षा जास्त नामांकने आणि अनेक पुरस्कार देखील मिळवले.

प्रत्येक व्यक्तीच्या कधी ना कधी चुका घडतात, इतरांची मने दुखावली जातात. कधी शारीरिक तर, कधी मानसिक इजा पोहोचवली जाते. या सर्व व्यक्तीसापेक्ष घटनांचा संबंध जात, धर्म, वर्णाशी जोडणे पूर्णतः चुकीचे आहे. त्यास केवळ ती संबंधित व्यक्तीच जबाबदार असते. जीवनाच्या प्रवाहात काही व्यक्ती पुन्हा भेटतात. तेव्हा कोणताही पूर्वग्रह न ठेवता क्षमा करणे अथवा क्षमा मागणे काहीच गैर नाही. आज आपण कोणाचेही नुसते नाव ऐकले तरी क्षणात त्या व्यक्तीची जात, धर्म, संस्कार, मानसिकता, स्वभाव याबाबत मनात आडाखे बांधूनच त्याच्याशी व्यवहार करतो. कोणताही ठोस मुद्दा व्यक्त करण्याकरिता नसेल तेव्हा जाती धर्मावर टिप्पणी करून आत्मशांती करून घेतो; परंतु विद्वेषाच्या ठिणगीने माणुसकीलाच चूड लावून, परिणामी देशाच्या प्रगतीला खीळ घालत असतो. विचारांना जागृत करण्याचा पॉल हॅगीसचा हा प्रयत्न कौतुकास्पद आहे; परंतु नामांकित कलावंतांच्या अभिनयाने समद्ध अशा चित्रपटाने या वैश्विक समस्येला ऐरणीवर ठेवले असले तरी, तो त्यावरचे उत्तर शोधत नाही; हे मात्र खरे आणि आजही टोकाच्या राष्ट्रवादामुळे अमेरिकेत जशी ही समस्या वाढतच आहे. तशी इतर देशांत देखील वाढतच आहे.तेव्हा समाजानेच यावर सद्सद्विवेकबुद्धीने विचार करून या विषयावर सुसंवाद निर्माण करणे गरजेचे आहे. तरच हा जीवन संघर्ष अधिक आनंदमय होईल आणि धरतीवर साने गुरुजी म्हणतात तसे नंदनवन फुलेल.

कुणा ना व्यर्थ शिणवावे, कुणा ना व्यर्थ हिणवावे।
समस्ता बंधु मानावे, जगाला प्रेम अर्पावे।।
प्रभूची लेकरे सारी, तयाला सर्वही प्यारी।
कुणा ना तुच्छ लेखावे, जगाला प्रेम अर्पावे।।
खरा तो एकची धर्म, जगाला प्रेम अर्पावे।।

## ‘हिंद की चादर’ कार्यक्रमाच्या पूर्वतयारीसाठी ५० पेशन्ट ट्रान्सफर शीट्सचे वितरण

### जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या हस्ते जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालयास साहित्य सुपूर्द

**नांदेड प्रतिनिधी:** नांदेड शहरात दि. २४ व २५ जानेवारी २०२६ रोजी ‘हिंद दी चादर’ श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास केंद्रीय मंत्री, विविध राज्यांचे मुख्यमंत्री, मंत्री, वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी यांच्यासह देश-विदेशातून लाखो भाविक उपस्थित राहणार आहेत. या पार्श्वभूमीवर कार्यक्रमाची पूर्वतयारी व सज्जता युद्धपातळीवर सुरू आहे.

लाखो भाविकांच्या उपस्थितीमुळे आपत्कालीन परिस्थितीत वैद्यकीय व्यवस्थेची तत्काळ सुविधा उपलब्ध राहावी, या दृष्टीने जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय पेरके यांनी जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नांदेड राहुल कर्डिले यांच्याकडे ५० पेशन्ट ट्रान्सफर शीट्स (स्ट्रेचर) उपलब्ध करून देण्याची मागणी केली होती. या मागणीस जिल्हाधिकाऱ्यांनी तात्काळ मान्यता देत आज दि. २३ जानेवारी २०२६ रोजी जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालयास त्यांच्या हस्ते सदर साहित्य वितरीत केले.

यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण किरण अंबेकर, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी किशोर कु-हे, महसूल सहायक बारकुजी मोरे, गौरव तिवारी (डीडीएमएस) तसेच जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

ही ५० पेशन्ट ट्रान्सफर शीट्स आपत्कालीन परिस्थितीत रुग्णांना कार्यक्रमस्थळावरून मुख्य रस्त्यापर्यंत, रुग्णवाहिकेपर्यंत व रुग्णालयापर्यंत सुरक्षितपणे पोहोचविण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहेत. ‘हिंद दी चादर’ या भव्य सोहळ्यासह नांदेड शहर व जिल्ह्यात होणाऱ्या इतर मोठ्या कार्यक्रमांदरम्यान तसेच भविष्यातील आपत्कालीन परिस्थितीतही या साहित्याचा कायमस्वरूपी उपयोग होणार आहे.

# हिंद-दी-चादर कार्यक्रमाच्या स्वागतासाठी नांदेड नगरी सज्ज

➤ जिल्हा प्रशासनाची तयारी पूर्ण

➤ कार्यक्रमासाठी प्रवेश पासची आवश्यकता नाही




**नांदेड प्रतिनिधी:** नांदेड येथे उद्यापासून दोन दिवस हिंद-दी-चादर अंतर्गत शिखांचे नववे गुरु श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या ३५० व्या शहिदी समागम वर्षानिमित्त भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाची सर्व तयारी पूर्ण झाली असून भाविकांच्या स्वागतासाठी नांदेड नगरी सज्ज झाली आहे. या ऐतिहासिक कार्यक्रमाचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे.

या कार्यक्रमाच्या अनुषंगाने शनिवार २४ जानेवारी रोजी सकाळी श्री गुरु ग्रंथ साहिब नगर कीर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे. हे भव्य महानगर कीर्तन सकाळी ८ वाजता गुरुद्वारा गेट क्रमांक १ येथून प्रारंभ होऊन गुरुद्वारा चौक - महावीर चौक - वजिराबाद मार्केट - वजिराबाद चौक - तिरंगा चौक - रामसेतू दादरा - रवी नगर - नागार्जुन पब्लिक स्कूल - मामा चौक या मार्गाने मोदी मैदान, मुख्य कार्यक्रमस्थळी पोहोचणार आहे.

या मार्गावरील सर्व नागरिकांनी आपल्या घरांसमोर व दुकानांसमोर रंगीबेरंगी फुले, रांगोळी, विद्युत रोषणाई व दिव्यांच्या माध्यमातून सजावट करून पालखीचे स्वागत करावे व या भव्य महानगर कीर्तनात सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

हा कार्यक्रम दोन्ही दिवस सकाळी ८ ते रात्री १० वाजेपर्यंत सुरू राहणार आहे. कार्यक्रमस्थळी येण्यासाठी आजूबाजूच्या परिसरातील नागरिकांसाठी जिल्हा प्रशासनाच्यावतीने मोफत वाहनसेवेची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच, भाविकांसाठी भव्य लंगरची व्यवस्था करण्यात आली असून देश-विदेशातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमस्थळी आरोग्य विभागामार्फत मोफत आरोग्य तपासणी शिबिरे देखील आयोजित करण्यात आली आहेत.

**हिंद-दी-चादर कार्यक्रम सर्वांसाठी खुला असून प्रवेशासाठी कोणत्याही पासची आवश्यकता नाही**

श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या ३५० व्या शहिदी समागम वर्षानिमित्त २४ व २५ जानेवारी रोजी आयोजित हा कार्यक्रम सर्वांसाठी खुला असून नागरिकांनी कुटुंबासह मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

# मध्य रेल्वेच्या दक्षता पथकाने बनावट / तोतया रेल्वे दक्षता अधिकाऱ्याला पकडले ५५० उमेदवारी अर्ज दाखल

**मुंबई प्रतिनिधी:** मध्य रेल्वेच्या दक्षता पथकाने एका महत्त्वपूर्ण कारवाईत, रेल्वे बोर्डाचा दक्षता निरीक्षक असल्याची खोटी ओळख दाखवून एका रेल्वे कर्मचाऱ्याकडून पैसे मागणाऱ्या एका व्यक्तीला अटक केली आहे.

रेल्वे कर्मचाऱ्याकडून प्राप्त माहिती व तक्रारीच्या आधारे मध्य रेल्वेच्या दक्षता पथकाने कारवाईचे नियोजन करून दिनांक २२.०१.२०२६ रोजी कल्याण रेल्वे स्थानकावर सापळा रचला. या कारवाईदरम्यान तक्रारदाराकडून रु २०,०००/- स्विकारताना हरीश कांबळे याला दक्षता पथकाने रंगेहाथ पकडले.

आरोपी हरीश कांबळे याने स्वतःला रेल्वे बोर्डचा दक्षता निरीक्षक असल्याचे भासवून डीआरएम कार्यालय, मुंबई येथील थकीत वेतन मंजूर करून देण्याच्या नावाखाली तक्रारदाराकडून रु २०,०००/- ची मागणी केली होती.

यापूर्वी, आरोपी हरीश कांबळे याने तक्रारदाराकडून बदलीसाठी ६०,०००/- रुपये घेतल्याचा आरोप आहे, जी रक्कम ऑनलाइन पे करण्यात आली होती, परंतु बदली झालीच नाही. आरोपीने पुन्हा तक्रारदाराशी संपर्क साधून थकीत रकमेची लवकर परतफेड करून देण्याची ऑफर दिली. काहीतरी गैरप्रकार होत असल्याचा संशय आल्याने, तक्रारदाराने दक्षता विभागाशी संपर्क साधला आणि त्यानुसार एक कारवाईची योजना आखण्यात आली. श्री हरीश कांबळे याला २०,०००/- रुपयांची लाच घेताना रंगेहाथ पकडण्यात आले आणि पुढील कारवाईसाठी शासकीय रेल्वे पोलीस (जीआरपी), कल्याणच्या ताब्यात देण्यात आले.

फसवणूक व तोतयागिरीच्या आरोपाखाली भारतीय न्याय संहिता अधिनियम, २०२३ (इछड) मधील कलम ३१८(२) व ३१९(२) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कलम ३१८(२) अंतर्गत दंड व कमाल ३ वर्षांपर्यंत कारावास, तर कलम ३१९(२) अंतर्गत दंड व कमाल ५ वर्षांपर्यंत कारावास किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात.



मध्य रेल्वे भ्रष्टाचाराविरुद्ध शून्य सहनशीलतेच्या आपल्या भूमिकेची पुनरुच्चार करत असून, रेल्वे कर्मचारी व सर्वसामान्य नागरिकांनी अशा कोणत्याही फसवणूक अथवा बनावट प्रकारांविषयी सतर्क राहून संबंधित प्राधिकरणांकडे तक्रार नोंदवावी, असे आवाहन करते.

# हिंद दी चादर कार्यक्रमाच्या पूर्वतयारीचा लोकप्रतिनिधी व मान्यवरांकडून आढावा

**नांदेड प्रतिनिधी:** तख्त सचखंड श्री हुजूर साहिब नांदेड येथे आयोजित हिंद दी चादर श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त होणाऱ्या कार्यक्रमाच्या पूर्वतयारीबाबत आतपर्यंतच्या कामकाजाचा आज लोकप्रतिनिधी व मान्यवरांनी एकत्र येत आढावा घेतला.

जिल्हा नियोजन भवनच्या सभागृहात हिंद दी चादर श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आमदार प्रताप पाटील चिखलीकर, माजी आमदार सुभाष साबणे, माजी आमदार मोहनराव हंबर्डे, मुख्यमंत्र्यांचे विशेष कार्य अधिकारी रामेश्वर नाईक, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, निवासी उप जिल्हाधिकारी किरण अंबेकर यांच्यासह विविध लोकप्रतिनिधी व अधिकारी उपस्थित होते. आमदार प्रताप पाटील चिखलीकर



म्हणाले, नांदेडसह राज्याच्या वैभवात भर घालणारा हा ऐतिहासिक कार्यक्रम आहे. कार्यक्रमासाठी देशभरातून भाविक येणार आहेत. कार्यक्रमासाठी आपली सेवा महत्त्वाची ठरणार आहे. लोकप्रतिनिधी, प्रशासन आणि आयोजन समिती यांच्या समन्वयातून कार्यक्रम यशस्वी करूया. प्रत्येकाने या ऐतिहासिक सोहळ्यात आपला सहभाग नोंदवावा. असे आवाहन त्यांनी केले. मुख्यमंत्र्यांचे विशेष कार्य अधिकारी रामेश्वर नाईक यांनी सांगितले की, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यात नागपूर, नांदेड व मुंबई येथे ‘हिंद दी चादर’ शहीदी समागम साजरा होत आहे. नांदेड येथील २४ व २५ जानेवारी २०२६ रोजी होणाऱ्या सोहळ्यास देशाचे गृहमंत्री अमित शहा यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

## हिंद दी चादर गुरु तेग बहादुर साहेब यांचे ३५० वे शहीदी समागम वर्ष

### जिल्ह्यातील २७८९ शाळांमध्ये दररोज प्रभात फेऱ्यांद्वारे जनजागृती

**छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी:** हिंद दी चादर श्री गुरुतेग बहादुर यांच्या ३५० व्या शहीद समागम वर्षानिमित्त त्यांचे कार्य व इतिहास विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचावा यासाठी शाळांमध्ये जनजागृतीपर उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्यात विविध शाळांमध्ये माहितीपट प्रदर्शन, चित्रकला स्पर्धा, प्रभात फेरी आदी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी या उपक्रमांमध्ये उत्स्फूर्त सहभाग घेतला. जिल्ह्यातील २७८९ शाळांमध्ये दररोज प्रभात फेऱ्या आयोजीत करुन जनजागृती केली जात आहे, अशी माहिती जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्य.) आश्विनी लाठकर यांनी दिली आहे. जिल्ह्यातील एकूण ३०७४ प्राथमिक शाळांपैकी २८९२ शाळेत प्रभात फेऱ्या घेतल्या आहेत, तर त्यातील २७८९ शाळेत दररोज प्रभात फेऱ्या घेण्यात येतआहेत. शिक्षणविभागाच्या माध्यमिक विभागाच्या एकूण १२७७ शाळांपैकी ११०२ शाळांचा तर उच्च माध्यमिक विभागातील१५७ शाळांपैकी १४१ शाळांचा या उपक्रमात सहभाग आहे. तसेच २८९२ प्राथमिक शाळांमध्ये श्री गुरु तेग बहादुर साहेब जी यांच्या जीवनावर स्पर्धा परीक्षा आयोजीत करुन गीत व डॉक्युमेंटरी दाखवण्यात आली. तर ११०२ माध्यमिक शाळेत व १४१ उच्च माध्यमिक शाळेत गुरुतेग बहादुर साहेबजी यांच्या जीवनावर स्पर्धा परीक्षा घेण्यात आल्या गीत व डॉक्युमेंटरी दाखवण्यात आली. तालुकास्तरीय स्पर्धा मंगळवार दि.२० रोजी संपन्न झाल्या असून आणि आज जिल्हास्तरीय स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धांचे निकाल संकलित करणे सुरू आहे. आज घेण्यात आलेल्या स्पर्धांमध्ये गायन,चित्रकला,निबंध स्पर्धा,वकृत्व स्पर्धा व स्पर्धा परीक्षा घेण्यात आल्या. या स्पर्धांमधून गुरु तेग बहादूर यांच्या जीवन कार्याविषयी विद्यार्थ्यांना माहिती मिळून जनजागृती होत आहे.

# काँग्रेस पक्षाने नेहमीच ग्रामीण भागाच्या विकासाला चालना दिली - धिरज विलासराव देशमुख

### लातूर जिल्हा परिषद व पंचायत समितीवर काँग्रेस पक्षाचा झेंडा फडकवण्याचा निर्धारसेवा पुरस्कार प्रदान

**लातूर/ प्रतिनिधी:** लातूर जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर धनेगाव येथील रोकडेश्वर मंदिरात माजी आमदार तथा लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष धिरज विलासराव देशमुख यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून निवडणूक प्रचाराचा शुभारंभ करण्यात आला.




यावेळी भातांगळी गटाचे उमेदवार सुनिल पडीले, उमेश बेद्रे,शोभा बरचे,महाराणा प्रताप नगरचे महादेव मस्के,प्रिया नामदेव उफाडे,पुजा नितीन जाधव, राज्य साखर संघाचे सदस्य आबासाहेब पाटील, प्रवीण पाटील, संतोष देशमुख, दगडूसाहेब पडीले, राजेसाहेब पाटील, सचिन बंडापल्ले, इसरार सगरे,श्रीरंग दाताळ,शंकर बोळंगे,

श्रीहरी चामले, प्रताप पाटील, सतीश पाटील, युवराज जाधव, लिंबराज पाटील, दत्तात्रय वीर, अरुण वीर, विनोद वीर, विपिन गवरे, अनंत ठाकूर, बळवंत पाटील, हरीश बोळंगे, परमेश्वर पाटील, हरिभाऊ गोणे,भालचंद्र पाटील, पंडितराव सांडूर,परमेश्वर मनदुमले, सागर शिंदे, जयप्रकाश पाटील, शिवाजी देशमुख, अविनाश देशमुख, मनोज देशमुख, महादेव जटाळ, गोविंद देशमुख, जहांगीर पठाण, भास्कर सूर्यवंशी, अंगद वाघमारे, किशोर सूर्यवंशी, रणजीत पाटील,सचिन दाताळ, संभाजी रेड्डी, फरमान शेख, शंकर पाटील आदींची उपस्थिती होती.

यावेळी बोलताना धिरज विलासराव देशमुख यांनी सांगितले की, काँग्रेस पक्ष हा नेहमीच शेतकरी, कामगार, युवक, महिला व सर्वसामान्य जनतेच्या हिताचा विचार करणारा पक्ष असून स्वातंत्र्यापासून ते आजपर्यंत देशाच्या आणि राज्याच्या उभारणीत काँग्रेसचे योगदान अतुलनीय आहे. ग्रामीण भागातील रस्ते, पाणीपुरवठा, शिक्षण, आरोग्य, कृषी आणि सहकार क्षेत्राच्या विकासात काँग्रेस पक्षाची भूमिका नेहमीच अग्रगण्य राहिली आहे.

काँग्रेस पक्षाने राबवलेल्या विविध विकासात्मक योजना, सामाजिक न्यायाची धोरणे आणि सर्वसमावेशक विकासाची भूमिका यामुळेच ग्रामीण भाग मजबूत झाला असून स्थानिक स्वराज्य संस्थांमधून पारदर्शक आणि लोकाभिमुख प्रशासन देण्याची क्षमता काँग्रेस पक्षात आहे, असेही त्यांनी नमूद केले.

येत्या ५ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या मतदानात जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत काँग्रेस पक्षाच्या सर्व उमेदवारांना भरभरून मतदान करून विजयी करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले. लातूर जिल्हा परिषद व पंचायत समितीमध्ये काँग्रेस पक्षाची सत्ता स्थापन करण्याचा निर्धार यावेळी उपस्थित सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी व्यक्त केला.

या कार्यक्रमास भातांगळी व महाराणा प्रताप नगर येथील काँग्रेस पक्षाचे जिल्हा परिषद व पंचायत समितीचे उमेदवार, पक्षाचे पदाधिकारी तसेच असंख्य कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नांदेड येथील ‘हिंद-दी-चादर’च्या ३५० व्या बलिदान पर्वासाठी धाराशिवहून लंगर साहित्याचा ट्रक रवाना



**धाराशिव/ प्रतिनिधी:** नांदेड येथे दि. २४ व २५ जानेवारी रोजी आयोजित ‘हिंद-दी-चादर’ श्री गुरु तेग बहादूर साहेबजी यांच्या ३५० व्या बलिदान पर्वानिमित्त भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.या कार्यक्रमासाठी लंगर सेवेसाठी आवश्यक असलेल्या विविध वस्तू व साहित्याचा पुरवठा करणारा ट्रक धाराशिव येथून काल जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांनी हिरवी झेंडी दाखवून रवाना केला.या प्रसंगी जिल्हाधिकारी किरण पुजार यांनी,गुरुदेव श्री गुरु तेग बहादूर साहेबजी यांच्या बलिदानातून मानवतेची,धर्मस्वातंत्र्याची व सामाजिक सलोख्याची प्रेरणा मिळते,असे प्रतिपादन केले.

नांदेड येथे होणाऱ्या या समारंभात मोठ्या संख्येने भाविक सहभागी होणार असून, त्यांच्या सेवेसाठी लंगर ही परंपरा सामाजिक एकतेचे प्रतीक असल्याचे त्यांनी नमूद केले.

धाराशिव जिल्ह्यातील समाजबांधवांच्या सहकार्याने लंगरसाठी आवश्यक साहित्य वेळेत पोहोचावे,यासाठी प्रशासनाने योग्य नियोजन केल्याचेही त्यांनी सांगितले.

या ट्रकद्वारे लंगरसाठी लागणारे धान्य, स्वयंपाक साहित्य व इतर आवश्यक वस्तू नांदेडकडे पाठविण्यात आल्या आहेत. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रशासन,स्वयंसेवी संस्था व समाजबांधव यांचा समन्वय महत्त्वाचा असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी विद्याचरण कडवकर,तहसीलदार (महसूल) प्रकाश व्हटकर,नायब तहसीलदार संतोष पाटील यांच्यासह अन्य कर्मचारी उपस्थित होते.उपस्थित मान्यवरांनी या उपक्रमाचे कौतुक करत कार्यक्रमाच्या यशासाठी शुभेच्छा दिल्या.

नांदेड येथे होणारा हा दोन दिवसीय कार्यक्रम ऐतिहासिक व आध्यात्मिक महत्त्वाचा असून,देशभरातून व राज्यातून भाविकांची उपस्थिती आहे.या पार्श्वभूमीवर धाराशिव जिल्ह्यातून लंगरसाठी पाठविण्यात आलेले साहित्य हे सेवाभाव आणि सामाजिक एकात्मतेचे उत्तम उदाहरण ठरत असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.




शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# विद्याभवन हायस्कूल, कळंब प्रशालेत बाल आनंद मेळाव्याचे आयोजन




कळंब (प्रतिनिधी)- प्रतिनिधी विद्या भवन हायस्कूल कळंब प्रशालेत बाल आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या बाल आनंद मेळाव्याचे उद्घाटन प्रशालेचे मुख्याध्यापक कुंभार व्ही जी, उपमुख्याध्यापक मयाचारी व्ही एस, पर्यवेक्षक श्रीमती कोळी जे एन यांच्या हस्ते करण्यात आले. या बाल आनंद मेळाव्यात विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेल्या वेगवेगळ्या खाद्यपदार्थाचे ५० स्टॉल लावण्यात आले होते .या उपक्रमात विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात आनंदाने सहभाग नोंदवला. विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या खाद्यपदार्थाचा आस्वाद घेतला. कमवा व शिका यातून विद्यार्थ्यांनी शिक्षणाबरोबर व्यावहारिक ज्ञान, खरेदी-विक्री ,ग्राहकाशी संवाद कौशल्य हे विविध कौशल्य विद्यार्थ्यांनी आत्मसात करावेत यातूनच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होत असतो.

प्रशालेतील शिक्षक सुशील कुमार तीर्थकर, विनोद सागर, जिंदमवार एन डी, महेश माळवदकर,आप्पासाहेब वाघमोडे, संजय मडके शहाजी माने, संदीप पाटील ,बंडू काळे ,अकबर शेख, विशाल पवार , शरद टोपे, चव्हाण सर ,रवी कोल्हे, बाल आनंद मेळाव्यासाठी परिश्रम घेतले . प्रशालेतील सर्व शिक्षक व शिक्षकेत कर्मचारी उपस्थित होते .या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख पवार एस.जे यांनी केले.

### शहर माझे, जबाबदारी आपली!

# अक्षय ढोबळेंचा थेट जनतेला इशारा – स्वच्छतेतूनच धाराशिवचा राजकीय बदल!

**धाराशिव (रामेश्वर डोंगरे)–** शहर आता फक्त पाहत बसणार नाही, तर बदल घडवणार आहे– आणि या बदलाचा चेहरा ठरत आहेत उपनगराध्यक्ष अक्षय ढोबळे. स्वच्छतेसारख्या विषयावर राजकारण करणारे अनेक असतात, पण स्वतः पुढे उभं राहून लोकांना जबाबदारीची जाणीव करून देणारे नेतृत्व क्वचितच दिसते–आणि तेच काम अक्षय ढोबळे करत आहेत.

शहर अस्वच्छ असेल, तर दोष फक्त प्रशासनाचा नाही;

आणि शहर स्वच्छ असेल, तर श्रेय फक्त सत्तेचंही नाही!

हा थेट, स्पष्ट आणि कडवा संदेश देत अक्षय ढोबळेंनी लोकांनाच साक्षीदार केलं आहे.

राजकीय पद म्हणजे केवळ मिरवणूक नव्हे, तर लोकांच्या प्रश्नांवर उभं राहण्याची जबाबदारी असते, हे त्यांनी कृतीतून दाखवलं. स्वच्छतेच्या नावाखाली केवळ



फाईली फिरवणं नाही, तर रस्त्यावर उतरून, परिसरनिहाय लक्ष देत, नागरिकांना सहभागी करून घेणं– हीच त्यांची राजकीय ताकद आहे.

आज धाराशिवमध्ये स्वच्छतेचा मुद्दा केवळ प्रशासनाचा विषय राहिलेला नाही; तो लोकांचा लढा बनत आहे. आणि या लढ्याचं नेतृत्व अक्षय ढोबळे करत आहेत, हीच बाब त्यांच्या वाढत्या प्रभावाची साक्ष देते.

तरुण, ठाम आणि निर्णयक्षम नेतृत्व म्हणून अक्षय ढोबळे हे नाव आता केवळ उपनगराध्यक्ष म्हणून मर्यादित राहिलेलं नाही. कामातून राजकारण हा नवा पॅटर्न त्यांनी उभा केला असून, तो लोकांच्या मनात घर करत आहे.

स्वच्छ धाराशिव ही केवळ संकल्पना नाही, तर लोकशक्ती + नेतृत्वशक्ती यांचा संगम आहे–

आणि या संगमाचं केंद्रबिंदू ठरत आहेत अक्षय ढोबळे.

# असाक्षर मुक्त गावाचा संकल्प घेऊन प्रजासत्ताक दिन साजरा करण्याचे आवाहन: नवभारत साक्षरता कार्यक्रमाला गती

धाराशिव, (जिमाका) -देशाला साक्षरतेच्या दिशेने अधिक सक्षम बनविण्याच्या उद्देशाने केंद्र शासन पुरस्कृत नवभारत साक्षरता कार्यक्रम संपूर्ण देशभर राबविण्यात येत असून, राज्यात हा कार्यक्रम शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या माध्यमातून प्रभावीपणे अंमलात आणण्यात येत आहे.या कार्यक्रमाच्या अनुषंगाने प्रजासत्ताक दिनानिमित्त असाक्षर मुक्त गावाची शपथ घेऊन हा राष्ट्रीय सण साजरा करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

नवभारत साक्षरता कार्यक्रमांतर्गत देशातील १५ वर्षे व त्यावरील वयोगटातील असाक्षर व अल्पसाक्षर व्यक्तींना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यावर भर देण्यात येत आहे.

या कार्यक्रमामध्ये केवळ अक्षरओळख मर्यादित न ठेवता, जीवनोपयोगी कौशल्यांच्या विकासालाही प्राधान्य देण्यात आले आहे.यामध्ये आर्थिक साक्षरता, कायदेविषयक साक्षरता,डिजिटल साक्षरता,आपत्ती व्यवस्थापन कौशल्य,आरोग्याची काळजी व जनजागृती,बालसंगोपन व शिक्षण, कुटुंब कल्याण,व्यवसाय व उपजीविकेची कौशल्ये,तसेच कला, विज्ञान,तंत्रज्ञान,संस्कृती,क्रीडा, मनोरंजन आणि स्थानिक नागरिकांना आवड असलेल्या विषयांचा समावेश आहे.

नवभारत साक्षरता कार्यक्रम ही योजना दिनांक १ एप्रिल २०२२ ते ३१ मार्च २०२७ या कालावधीत राबविण्यात येत असून,ही योजना सर्व राज्ये व केंद्रशासित प्रदेशांतील ग्रामीण तसेच शहरी भागांमध्ये प्रभावीपणे अंमलात आणली जात आहे.

या कार्यक्रमाच्या माध्यमातून २६ जानेवारी २०२७ पर्यंत संपूर्ण गाव, कुटुंब व परिसर साक्षर करण्याचा संकल्प करण्यात येणार आहे.

मी अशी शपथ घेतो/घेते की,माझे संपूर्ण कुटुंब व गाव २६ जानेवारी २०२७ पर्यंत साक्षर करीन.मी स्वतः असाक्षर राहणार नाही व इतरांनाही असाक्षर राहू देणार नाही, अशी साक्षरतेची शपथ सर्व संबंधितांना देण्यात येणार असल्याची माहिती शिक्षणाधिकारी (योजना),जिल्हा परिषद यांनी दिली आहे.

२६ जानेवारी या प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने साक्षरतेचा हा संकल्प नागरिकांमध्ये नवचैतन्य निर्माण करणारा ठरेल,तसेच असाक्षर मुक्त गाव हे ध्येय साकार करण्यासाठी प्रत्येकाने पुढाकार घ्यावा,असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

# धाराशिवमध्ये दिव्यांग मतदारांचा इशारा: आश्वासन बाजीला नाही, कृतीशील उमेदवारांनाच पाठिंबा!

धाराशिव (प्रतिनिधी)-आगामी पंचायत समिती व जिल्हा परिषद निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर प्रहार दिव्यांग संघटना धाराशिव आणि शिव अर्पण दिव्यांग संघटना धाराशिव यांच्या संयुक्त बैठकीत एक अत्यंत महत्त्वपूर्ण, राजकीयदृष्ट्या निर्णायक आणि दिशादर्शक निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयामुळे केवळ राजकीय वर्तुळाचेच नव्हे, तर सर्व इच्छुक उमेदवारांचेही लक्ष दिव्यांग मतदारांकडे केंद्रीत झाले आहे.

या बैठकीत स्पष्ट करण्यात आले की, दिव्यांग मतदार हे कोणत्याही पक्षाचे किंवा उमेदवाराचे उपकाराचे नाहीत, तर ते लोकशाहीचे समान हक्कधारक घटक आहेत. जिल्ह्यातील हजारो दिव्यांग मतदार आता संघटितपणे आपली भूमिका मांडणार असून, त्यांचे मतदान हे केवळ संख्याबळ नसून निर्णय घडवणारी शक्ती ठरणार आहे.

बैठकीत जिल्ह्यातील इच्छुक उमेदवारांची सखोल चाचपणी करण्यात आली. ज्या पंचायत समिती व जिल्हा परिषद मतदारसंघात संघटनेचे अधिकृत उमेदवार नसतील, त्या ठिकाणी दिव्यांगांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करणाऱ्या, केवळ आश्वासनांवर राजकारण करणाऱ्या कोणत्याही उमेदवाराला पाठिंबा दिला जाणार नाही, असा ठाम निर्णय जाहीर करण्यात आला. संबंधित मतदारसंघातील दिव्यांग शाखेतील सर्व पदाधिकाऱ्यांशी चर्चा करूनच, उमेदवारांनी दिव्यांगांच्या हक्कांबाबत दिलेल्या लेखी, ठोस आणि कालमर्यादित आश्वासनांच्या आधारेच जिल्हा कार्यकारिणीच्या संमतीने पाठिंबा जाहीर केला जाणार आहे.

धाराशिव जिल्हा येथे दिव्यांग संघटनांच्या सुमारे २५० ते ३०० सक्रिय शाखा कार्यरत असून, हजारो दिव्यांग मतदार एकसंघपणे मतदान करण्यासाठी सज्ज आहेत. त्यामुळे यापुढे कोणतीही निवडणूक दिव्यांग मतदारशक्तीकडे दुर्लक्ष करून जिंकणे शक्य होणार नाही, हे संघटनांनी ठामपणे स्पष्ट केले.

दिव्यांग मत म्हणजे दया नव्हे, तो आमचा घटनात्मक हक्क आहे. जो उमेदवार दिव्यांगांच्या शिक्षण, रोजगार, आरोग्य, सुविधा आणि सन्मानाच्या हक्कांवर स्पष्ट, ठोस आणि कृतीशील भूमिका घेणार नाही, त्याला दिव्यांग मतदारांचा पाठिंबा मिळणार नाही, असा थेट आणि स्पष्ट इशारा शिव अर्पण दिव्यांग संघटनेचे संस्थापक अध्यक्ष तसेच प्रहारचे जिल्हाध्यक्ष यांनी दिला.

या निर्णयाला जिल्ह्यातील सर्व पंचायत समिती व जिल्हा परिषद प्रतिनिधींची एकमताने संमती देण्यात आली. बैठकीस जिल्हाउपाध्यक्ष बाळासाहेब पाटील, जिल्हा संघटक बाळासाहेब कसबे, उपाध्यक्ष महेश माळी, जिल्हा सचिव महादेव चोपदार, शहराध्यक्ष जमीर शेख यांच्यासह बाबासाहेब भोयटे, सचिन गुरव, धनंजय खांडेकर, कुमार नरवडे, अमोल पांडे, कृष्णा राऊत, समाधान खांडेकर, बळीराम गुरव, संतोष दनाने, महेश गावडे, नानासाहेब वागे, संदिप बारगोले, बप्पा होगले, औदुंबर भणगे, राजेंद्र आकाडे तसेच जिल्हा, तालुका व शहर स्तरावरील असंख्य पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दिव्यांगांच्या प्रश्नांवर केवळ भाषणबाजी न करता प्रत्यक्ष कृती, ठोस धोरणे आणि वेळेत अंमलबजावणी करणाऱ्या उमेदवारांनाच पाठिंबा दिला जाईल, असा ठाम निर्धार व्यक्त करत, या निवडणुकीत दिव्यांग मतदारशक्ती ही सत्तेची किल्ली ठरणार आहे, असा स्पष्ट संदेश या बैठकीतून देण्यात आला.

# दानपेटीतील अंगठी प्रकरणी वस्तुस्थिती स्पष्ट : मंदिर संस्थानची भूमिका मांडली

धाराशिव दि.२३ जानेवारी (जिमाका) दानपेटीमध्ये चुकून पडलेल्या मौल्यवान वस्तूंविषयी गेल्या दोन दिवसांपासून काही प्रसारमाध्यमांमध्ये वस्तुस्थिती न तपासता अपूर्ण व दिशाभूल करणाऱ्या बातम्या प्रसिद्ध होत असल्याच्या पार्श्वभूमीवर श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान, तुळजापूर यांनी अधिकृत खुलासा प्रसिद्ध केला आहे.

पुण्यातील भोसरी येथील भाविक सुरज कृष्णा टिंगरे हे दिनांक १९ ऑक्टोबर २०२५ रोजी दुपारी ४:१५ ते ४:३० या वेळेत श्री तुळजाभवानी देवींच्या दर्शनासाठी तुळजापूर येथे आले होते.दर्शनावेळी त्यांनी दानपेटी क्रमांक १२ मध्ये दान स्वरूपात काही रक्कम टाकत असताना त्यांच्या बोटातील सोन्याची अंगठी चुकून दानपेटीत पडल्याचा दावा केला आहे.सदर अंगठी परत मिळावी यासाठी त्यांनी ३० ऑक्टोबर २०२५ रोजी श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या कार्यालयाकडे लेखी विनंती अर्ज सादर केला होता.

या अर्जाच्या अनुषंगाने,दिनांक ३ ऑगस्ट २०१७ रोजी तत्कालीन जिल्हाधिकारी, धाराशिव तथा अध्यक्ष,श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान,तुळजापूर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीतील ठरावाचा संदर्भ मंदिर संस्थानने दिला आहे.या ठरावानुसार,श्री तुळजाभवानी देवींच्या दानपेटीत भाविकांकडून नजर चुकीने पडलेल्या मौल्यवान वस्तू या दान स्वरूपात समजण्यात येतील व त्या परत देण्यात येणार नाहीत,असा स्पष्ट निर्णय घेण्यात आलेला आहे.

या निर्णयानुसार,सुरज कृष्णा टिंगरे यांना मंदिर संस्थानच्या वतीने दिनांक १६ डिसेंबर २०२५ रोजी अधिकृत पत्राद्वारे सदर बाब कळविण्यात आली आहे.मात्र,या प्रकरणाबाबत काही प्रसारमाध्यमांनी वस्तुस्थिती न तपासता बातम्या प्रसिद्ध केल्याने भाविकांमध्ये गैरसमज निर्माण होत असल्याचे मंदिर संस्थानने नमूद केले आहे.

मंदिर संस्थानने स्पष्ट केले आहे की, यापूर्वी अशा प्रकारच्या घटनांचा गैरफायदा घेण्याचे प्रकार समोर आलेले आहेत.काही अपप्रवृत्तीचे लोक चुकून दानपेटीत मौल्यवान वस्तू पडलीअसा दावा करून दानपेटीतून मौल्यवान वस्तू मिळवण्याचा प्रयत्न करत होते. अशा प्रकारची फसवणूक रोखण्यासाठी तसेच दानपेटीतील पारदर्शकता व सुरक्षितता राखण्यासाठीच हा नियम करण्यात आलेला आहे.हे विशेषत्वाने नमूद करण्यात आले आहे की,असा नियम करणारे श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान हे एकमेव संस्थान नाही,तर देशातील अनेक देवस्थानांनीदेखील याच धर्तीवर असे नियम अमलात आणलेले आहेत.

तरी,प्रसारमाध्यमानी वस्तुनिष्ठता, अधिकृत कागदपत्रे व मंदिर संस्थानची भूमिका समजून घेऊनच बातम्या प्रसिद्ध कराव्यात,असे आवाहन श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या वतीने करण्यात आले आहे.तसेच,भाविक भक्तांनी दानपेटीमध्ये दान करताना दागिने व मौल्यवान वस्तूंबाबत विशेष दक्षता घ्यावी,असे नम्र आवाहनही श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान, तुळजापूर यांनी केले आहे

# धाराशिवमध्ये थंडी कायम, पुढील तीन दिवस तापमानात घट

धाराशिव धाराशिव जिल्ह्यातील कडाक्याची थंडी काही प्रमाणात ओसरली असली तरी अद्याप थंडी पूर्णपणे कमी झालेली नाही. शहरासह जिल्ह्यात दिवसभर ऊन असताना सायंकाळपासून पहाटेपर्यंत थंडी जाणवत आहे. गुरुवारी धाराशिव शहरात कमाल तापमान ३० अंश सेल्सियस तर किमान तापमान १६ अंश सेल्सियस होते. परंतु आजपासून पुढील तीन दिवसात किमान तापमान पुन्हा घट होऊन १३ अंशावर राहणार आहे. त्यानंतर रविवारपासून वातावरणातील बदलामुळे कमाल तापमान ३० अंशावर तर किमान तापमान १७ अंशावर राहणार असल्याचे हवामान विभागाचे अंदाज आहेत. त्यामुळे दुपारी उबदार वातावरण असले तरी रात्री व पहाटे कडाक्याची थंडी जाणवेल. सकाळी ९ वाजेपर्यंत विविध भागांत धुके राहण्याची शक्यता आहे. सध्या थंडी ओसरली असली तरी सततच्या वातावरण बदलामुळे लहान मुलांसह वयोवृद्धांना सर्दीसह अंगदुखीचा त्रास जाणवत आहे. धुके राहिल्यामुळे वाहनधारकांना प्रवास काळजीपूर्वक करण्याची आवश्यकता आहे. उत्तर भारतात सध्या एक मजबूत वेस्टर्न डिस्टर्बन्स सक्रिय आहे. या प्रणालीमुळे हिमालयात बर्फवृष्टीसह पाऊस होत आहे. तेथून येणारी अतिथंड आणि कोरडी हवा उत्तर-पश्चिम दिशेने ५ ते १० किमी प्रति तास वेगाने उत्तर महाराष्ट्राकडे सरकत आहे, ज्याचा परिणाम धाराशिवमध्ये जाणवतो. तसेच रबी हंगामातील शेतीपिकांना पाणी देण्याचे काम सुरु असल्याने ओलीताखालील पिकांमुळे शहर परिसरात गारठा अधिक जाणवतो.

जिल्ह्यात कडाक्याची थंडी नसली तरी अद्याप थंडी पूर्ण कमी झालेली नाही. महिणाअखेरपर्यत कमाल, किमान तापमानातील बदलासह दि.२६ जानेवारीपर्यंत जिल्ह्यात ढगाळ वातावरणासह गारठा जाणवणार आहे. ढगाळ वातावरणामुळे गारठा टिकून राहील असा अंदाज आहे. - डॉ. नकुल हारवाडीकर, कृषी हवामान शास्त्रज्ञ, तुळजापूर हिमालयात बर्फवृष्टी होत आहे. उत्तर भारतात थंडीचा कडाका कायम असून बंगालच्या उपसागरातील कमी दाबाची प्रणाली आणि अरबी समुद्रातील हालचालींमुळे सध्या सकाळी गारठ्यासह धुके राहत आहे. सकाळी ९ वाजेपर्यंत शेतशिवारात धुक्याचे प्रमाण जास्त राहिल. देशातील पंजाबच्या आदमपूर येथे देशातील सर्वात निच्चांकी तापमानाची नोंद झाली आहे. तर राज्यातील धुळे शहरासह धुळे जिल्ह्यातील निफाड येथे सर्वात कमी म्हणजेच १०.७ किमान तापमानाची नोंद झालीआहे.


## लातूर समाचार धाराशिव

बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क

9422472502

9175325708


## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ १ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२१४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४० २४)
२४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक ,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.

Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649